MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
दिशा

वर्ष पंधरावे / अंक ३ / मार्च २०१४

## संपादकीय

### सत्ता - थोडे विचार मंथन

पु. ग. सहस्त्रबुद्धे, शि. म. परांजपे, लो. टिळक, राज्यशास्त्रावर संशोधन करणारे पळशीकर, द. के. केळकर अशा आपल्याकडील अभ्यासकांचे साहित्य लक्षात घेतले; व पश्चिमेकडील देशांमध्ये निर्माण झालेले असेच साहित्य विचारात घेतले तर ''सत्ता'' म्हणजे काय याची धूसर कल्पना येऊ शकते. वि. कि. पिडिया सारख्या आधुनिक संदर्भ साहित्यात ही संकल्पना थोडक्यात व्याख्यारुपाने सांगण्यात आलेली आहे. इतर अनेक अमूर्त संकल्पनांप्रमाणेच ही संकल्पना मानवी इतिहासात सर्व क्षेत्रात आपल्याला आढळते.

#### सत्तेचे प्रकार किती?

जगावर नेमकी कोणाची व कशाची सत्ता चालते याचे उत्तर जो तो आपापल्या अनुभवांनुसार देतो. अगदीच ढोबळ यादी करावयाची तर माणसावर माणसाची, पैशांची, सर्वव्यापी परमेश्वराची, बाजाराची, ग्रंथांमधील विचार प्रवाहांची, वैद्यक शास्त्राची सत्ता चालू असते. वैद्यक शास्त्रात ॲलोपॅथी आयुर्वेद, होमिओपाथी युनानी अशी अगणित शास्त्रे कार्यरत असतात. समोरच्या माणसांनी आपल्या विचारांची प्रभाव मांडणी करणे, जीवन पद्धती स्वीकारायला लावणे यासाठी सत्ता गाजवणे हा वाक्प्रचार रुढ झाला आहे. त्या दृष्टीने यादीत भर टाकायची झाल्यास ज्ञान लालसा, अंधश्रद्धा नियती, होराशास्त्र अशा खंडीभर ज्ञान शाखा अस्तित्वात आहेतच.

#### सामान्यांचे गोंधळलेले जीवन

या सर्व पसाऱ्यात सामान्य माणूस पार गोंधळून, बावचळून जातो आणि पुढ्यात येईल तसे जगत रहातो. कोणाचे ऐकावे, कोणाचे मानावे, हे न कळल्याने चक्रव्यूव्हातल्या अभिमन्यूसारखी किंवा गोंधळलेल्या अर्जुनासारखी त्याची अवस्था होते. ही सर्व जिवंतपणीची मरणे आहेत, हे काहीवेळा त्याला स्पष्टपणे जाणवते पण जीवन लालसेपुढे त्याचे काही चालत नाही. 'गरीब बिचारी कुणी हाका.... अशा मेंढरांच्या कळपातील एखाद्या मेंढरागत त्याची अवस्था होते.

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

काही विचारवंत 'फार गहन वाचन करु नका' असे सांगतात. हे किती बरोबर ते ज्याचे त्याने ठरवावे पण ''तुमच्यापेक्षा आम्ही अडाणी बरे'' असे अज्ञानात रमणारे एक वेगळे जगही या जगात आहे.

**भासमान व शून्य प्रगती**

विकासात्मक मानसशास्त्र विज्ञानशाखा या जडणघडणीचा वय आणि कालसापेक्ष असा अभ्यास करत असते. भगवान श्रीकृष्णाच्या गीतेचे सार ''काल झाले ते चांगले होते आज आहे ते चांगले आहे व उद्या होईल ते ही चांगलेच होणार'' असा कल्याणप्रद सकारात्मक जीवनवाद शिकवते. या सत्ता आणि विचारांच्या प्रभावातून आपण पुढे पुढे जात आहोत आणि आपली प्रगती साधली जात आहे, असे माणसाला भासते. प्रगती ही संकल्पना पूर्णतः काल व व्यक्तिसापेक्ष आहे. त्यामुळेच पुढे जाणे हे आभासात्मक आहे. शून्य आणि सत्य आहे म्हणून जगातील प्रत्येक माणूस हा अपूर्ण आहेच. या अपूर्णपणात त्याचे माणूसपण असते.

गौतमबुद्ध श्रीसंत समर्थ रामदास स्वामी जे कृष्णमूर्ती, ॲरिस्टॉटल या सर्वांच्या साहित्यात, विचारांमध्ये या विचारधारेची मीमांसा आढळते. इतिहासातील विचार प्रवाह आणि त्याचा मानवी–जीवनावरील प्रभाव हा इतका प्रबळ आहे की विचारांचे अधिराज्य चांगल्या वाईट विचारांची प्रचंड सत्ता आपल्याला जाणवते. यापुढील काही अंकांमधून या विषयावर अधिक काही लिहावे असे तूर्त मनात आहे. विशेषतः सत्ता व तिच्या व्याख्या त्यांच्या मानवी जीवन संघर्षातून जाणवणारी काही सत्ते शोधावयाचा विचार आहे.

**– प्रा. मोहन पाठक**

●●●

## *विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर*



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा,
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी,
माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

**गुरुदेव रवींद्रनाथ टागोर**

वर्ष पंधरावे/अंक ३/मार्च २०१४

वर्ष पंधरावे/अंक ३/मार्च २०१४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १८ वे/अंक ९ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | प्रा. मोहन पाठक | |
| २) | वंदनीय कोण? | डॉ. विजय बेडेकर | ३ |
| ३) | ऑक्सफर्ड सेंटर फॉर हिन्दू अँड वैशणव स्टडीज | डॉ. सुधाकर आगरकर | ५ |
| ४) | श्रीमत् भगवद् गीता - अध्याय चौदावा<br>विषय : गुणत्रय विभाग योग | कै. शं. बा. मठ | ७ |
| ५) | साहित्य-जगत | श्री. शरद जोशी | १० |
| ६) | 'विश्वभ्रमंती' एक अनोखा दिवाळी अंक | श्रीमती आशा भिडे | १३ |
| ७) | नर्मदा परिक्रमा<br>भाग : ३ | श्री. अरविंद ओक | १७ |
| ८) | शोध भारताचा ! | श्री. अनंत गोखले | २१ |
| ९) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २३ |
| १०) | परिसर वार्ता | संकलित | २८ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगी मूल्ये द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगी मूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

– संपादक

# वंदनीय कोण?

*दिशाचे माननिय संपादक डॉ. विजय बेडेकर यांचा गेल्या सद्धर्माचे संपादकीय दिशाच्या वाचकांसाठी येथे देत आहोत – कार्यकारी संपादक*

''बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाउले'' हे संतवचन लिहिले, गेले त्याला आज चारशे वर्षे झाली. हजारो पाने लिहूनही जे सांगता येणार नाही असे मार्गदर्शक तत्त्व संतांनी या एका वाक्यात लिहून ठेवले आहे. 'वंद्य' होण्याकरता लायक कोण, तर ज्याची उक्ती व कृती यांमध्ये फरक नाही तो. दुर्दैवाने पुराणातील ही वांगी पुराणातच राहिली. सर्व विधिनिषेध धाब्यावर बसवून, कमरेचे सोडून डोक्याला बांधणारे आणि ज्ञानाच्या क्षेत्रात कवडीमोल किंमत असणारे मंत्री, संत्री हे या संतवचनाला मूठमाती देण्यात आघाडीवर राहिले. यांचे 'आदर्श' घोटाळे आता जगजाहीरच झाले आहेत. नावात काय आहे; हा साळसूद प्रश्न विचारणाऱ्यांनी 'खोब्रागडे' नावात किती वजन व जादू आहे हे नुकतेच बघितले. सामाजिक असो, राजकीय असो वा धार्मिक असो, प्रत्येक पदांबाबत काही व्यक्त व अव्यक्त जबाबदाऱ्या या पदस्थांच्या शिरावर येऊन पडतात. पण कुठलीही लायकी नसताना किंवा बेताचीच लायकी असताना यांच्या वागणुकीतून साहजिकच व्यक्त होत असतो तो सत्तेचा माज! या सर्व पार्श्वभूमीवर सध्याचा एक राजदूत, एक न्यायाधीश व संपादक यांची प्रकरणे बोलकी आहेत. ''लोकां सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः कोरडे पाषाण'', या उक्तीप्रमाणे या सर्वांची वागणूक आहे. मांजराने डोळे मिटून जरी दूध प्यायले तरी ती चोरी जशी लपत नाही; तशी या सर्व महाभागांच्या वागण्याची लक्तरे आज वेशीवर टांगली गेली आहेत.

कारगिलमधील विद्रूप करून पाठवलेली प्रेते, सोमालियन चाच्यांमुळे धरण्यात आलेले भारतीय खलाशी किंवा जॉर्ज फर्नांडिस यांच्यापासून माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांना अमेरिकेत दिल्या गेलेल्या वागणुकीमुळे अजूनपर्यंत भारतीय मुत्सद्दी किंवा परराष्ट्रीय खाते कधी कासावीस झालेले आपण पाहिले नाही. राष्ट्रीय अस्मिताही यामुळे धोक्यात आल्याचे आपण कधी ऐकले नाही. नावातील जादू येथेच दिसून येते. एकूण एक राजकारणी आणि भारतातील सारे विद्वत्जन अमेरिकेन आपल्या राजदूताला दिलेल्या या वागणुकीमुळे व्याकूळ झालेले दिसतात. अर्थातच, आपल्या राजदूताला अमेरिकेने दिलेली वागणूक, मग ती अमेरिकन कायद्यात बसणारी असली तरी असंस्कृतच होती आणि म्हणूनच आपली प्रतिक्रिया समर्थनीयच आहे.

अमेरिकेची आरेरावी आणि माजोरीपणा पहिल्या महायुद्धापासून, व्हिएतनाम ते अफगाणिस्तानातील युद्धापर्यंत जगजाहिर आहे. लैंगिक समानता, स्त्रीमुक्ती, मानवी अधिकार ते अगदी पर्यावरणाच्या नियमांपर्यंत अमेरिकेचे जगाला करावयाचे उपदेश व अमेरिकेतील वास्तव, यांत कायमच अंतर दिसून आले. या सर्व अधिकारांना आणि समानतेला एक सांस्कृतिक संदर्भ असतो आणि त्यांच्यामधील संतुलन या सांस्कृतिक पार्श्वभूमीवरच साधायचे असते. पण या देशातले डावे, पुरोगामी, मुक्त विचारवंतांना मात्र या अधिकारांची अमेरिकन सांस्कृतिक कुरघोडी सोयीची वाटली. अमेरिकेचा हा दुटप्पीपणा आणि उर्मटपणा याबाबत लिहायचे म्हटले तर जगातील सर्व शाई संपेल. भारताचे बहुतेक सगळेच दूतावास व सरकारी नोकरीतील त्यांचे

---

जे काम यशस्वी करण्याची कुवत तुमच्यामध्ये नसेल, त्या कामाची जबाबदारी घेऊ नका.

चालू असणारे व्यवहार हे कोणालाही उबग आणतील असेच आहेत. ही मंडळी तेथे गेल्यावर आपले नातेवाईक, खुशमस्करे यांची 'सुव्यवस्था' लावण्यात मग्न असतात. पाकिस्तानधार्जिण्या एका अमेरिकन व्यक्तीने आणि संस्थेने जगभर आयोजित केलेल्या परिसंवादास हेच संपादक, राजकारणी राष्ट्रहिताला सुरुंग लावून नुसतेच हजर राहिले नाहीत तर भारतच काश्मीरवर आक्रमण करत असल्याच्या निर्लज्ज प्रसाराला हातभारही लावत राहिले. अर्थातच एकांगी नि तकलादू निधर्मवाद आणि घराणेशाहीच्या मर्जीतले हे मुत्सद्दी असल्यामुळे, परराष्ट्र खात्याला राष्ट्रीय धोरण धोक्यात आल्यासारखे कधीच वाटले नाही.

भारतातील पाण्यापासून गरिबीपर्यंत कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना कोट्यवधी रुपयांचा पैसा अमेरिकेतून येतो; तेव्हा अमेरिकेचा उर्मटपणा यांच्या गावीही नसतो! एम. एफ. हुसेन यांच्या अभिव्यक्तीवर झालेल्या अन्यायाने मुक्त कलावंतांची झोप उडते, परंतु तसलीमा नसरीन यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याबाबत बोलताना मात्र यांच्या जिभा लुळया पडलेल्या असतात. असले दुहेरी मापदंड सर्रास वापरणारे 'विचारवंत' हे वंद्य तर नाहीतच; पण निंद्य आहेत.

हिंदूंच्या धर्मशास्त्रामध्ये प्रत्येक पदाला, मग ते घरातील आई-वडील असोत की सामाजिक 'महाजन' असोत, काही जबाबदाऱ्या आणि बंधनांच्या चौकटी आखून दिल्या आहेत. 'जे माझे नाही ते मी घेणार नाही', ही रामायणातील भरताची शिकवण आपण कधीच विसरून गेलो आणि आता अमेरिकन संकल्पनेप्रमाणे 'माझे ते तर माझेच, पण तुझे तेही माझेच' ही संस्कृती आपण स्वीकारली आहे. लाल दिव्यांच्या गाड्यांपासून ते टोल नाक्यांवरील कर्मचाऱ्यांनी टोल विचारला म्हणून धुडगूस घालणाऱ्या, मारामाऱ्या करणाऱ्या राजकारण्यांचा पदोपदी आढळणारा हा उर्मटपणा आपल्या चांगलाच अंगवळणी पडला आहे. या ढोंगी, आपमतलबी आणि स्वार्थी नोकरशाहा व राजकारण्यांनी अमेरिकेच्या उर्मटपणापेक्षा अधिक शरमेने मान खाली घालण्याची वेळ आपल्यावर आणली आहे. म्हणूनच शेवटी म्हणावेसे वाटते की, समाजाने, संतांनी सांगितलेल्या ''बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाउले'' अशा व्यक्ती, त्या जरी दुर्मीळ असल्या तरी त्यांनाच आपले प्रतिनिधी म्हणून निवडणे किंवा स्वीकारणे हितकारक आहे, अन्यथा मूल्यांची ही सर्वच घसरण थांबवणे अशक्य आहे.

'यथा राजा तथा प्रजा ' अशीही उक्ती आपल्याला परिचित आहे. जुने धर्मग्रंथ जाळून नवीन समाज निर्माण करता येत नाही. द्वेष, मत्सर, आहे तेही नष्ट करते आणि नवीन 'भ्रष्ट' निर्माण करते. प्रगती आणि नावीन्याच्या भ्रामक कल्पनांनी लग्नापासून पालकत्वापर्यंतच्या सगळया संस्कारांचा आपण पोरखेळ करून टाकला. अमेरिकेची उद्योगशीलता, वक्तशीरपणा, तेथली ग्रंथालये, संग्रहालये आणि विद्यापीठांचे अनुकरण करावेसे आपल्याला वाटत नाही; पण त्यांचा लैंगिक भोगवाद, आत्मकेंद्रित स्वैराचार आणि उर्मट जडवाद आपल्याला स्वीकारावासा वाटतो, हीच खरी शोकांतिका आहे. अमेरिकन चपला नि बूट घातलेल्या पायांची इतकी रेलचेल झाली आहे की या गर्दीत ती, बोले तैशी चालणारी वंदनीय पावले हरवून गेली आहेत.

**डॉ. विजय बेडेकर**
मा. संपादक
व्ही.पी.एम. 'दिशा'

•••

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

# ऑक्सफर्ड सेंटर फॉर हिन्दू अँड वैश्णव स्टडीज

*ऑक्सफर्डच्या भेटीतील नोंद घ्यावी, अशा संस्थेचा परिचय या लेखात करून दिला आहे. - संपादक*

ऑक्सफर्ड विद्यापीठातून पायी फिरत असताना आम्ही ''ऑक्सफर्ड सेंटर फॉर हिन्दू अँड वैश्णव स्टडीज'' अशी पाटी पाहिली होती. एवढ्या दूर ऑक्सफर्डमध्ये हिंदू धर्माचा अभ्यास करणारे केंद्र असेल, असे आम्हांला वाटलेदेखील नाही. त्यामुळे या केंद्राविषयी आणि केंद्रातील कार्याविषयी एक प्रकारचे कुतूहल आमच्या मनात निर्माण झाले. या केंद्राला भेट देण्याचे नियोजन आम्ही आधी केलेले नव्हते. त्यामुळे ऐन वेळेवर धडक मारली तर त्यांना काय वाटेल अशी धास्ती मनात होतीच. तरीही धाडस करायचे आम्ही ठरविले.

ऑक्सफर्ड शहरातील अतिशय महागड्या अशा रंडॉल्फ हॉटेलच्या शेजारीच हे केंद्र आहे. केंद्राचे कार्यालय पहिल्या मजल्यावर आहे आणि पाटी मात्र तळमजल्यावर आहे. कारण येथूनच त्यांच्या कार्यालयात जाणारा जीना जातो. जेथे केंद्राच्या नावाची पाटी आहे, तेथील बेलची बटन आम्ही दाबली. त्याबरोबर तेथे असलेल्या स्पीकरमधून आवाज आला. बाहेरूनच आम्ही आपली ओळख दिली आणि केंद्राला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली. पुढच्या व्यक्तीने आम्हांला दार उघडून दिल्याचे व वर येण्याची सूचना केली. त्याच्याजवळ असलेली कळ दाबून त्याने ते दार उघडले होते. पडत्या फळाची आज्ञा मानून आम्ही जिना चढू लागलो. जिन्यातच दोन्ही बाजूला भारतीय संस्कृतीची ओळख करून देणारी चित्रे लावलेली आहेत. लवकरच आम्ही केंद्राच्या स्वागत कक्षात पोहचलो. तेथील व्यक्तीने आमचे स्वागत केले आणि वाचनालयात बसण्याची विनंती केली. त्यानुसार वाचनालयात असलेल्या गोलाकार टेबलाभोवती आम्ही स्थानापन्न झालो.

ज्ञानाची उपसासना हे ऑक्सफर्डचे वैशिष्ट्य आहे. भाषा, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, पुरातत्वशास्त्र अशा अनेक विषयांचा अभ्यास येथे होतो. त्याचबरोबर एका प्राचीन धर्माचा देखील पध्दतशीर अभ्यास व्हावा, असे ऑक्सफर्डमधील काही बुद्धिवंताना वाटू लागले. हिंदू हा धर्म नाही तर एक विचारप्रणाली आहे. या धर्माचा कोणी संस्थापक नाही. तरीही वर्षानुवर्षे भारतातील लोकांना धार्मिकतेचे धडे त्यातून मिळत आलेले आहेत. त्यामुळे हिंदुत्व या विचारसरणीविषयी सर्वत्र कुतूहल आहे. तसेच कुतूहल येथील विचारवंताना असणे साहाजिक आहे. कुतूहलापोटीच त्यांनी हिंदू आणि वैशणव पंथ यांचा अभ्यास सुरू केला. कालांतराने या कामाला विद्यापीठाची मान्यता मिळाली. आज हे केंद्र ऑक्सफर्ड विद्यापीठाचा एक भाग म्हणून कार्य करते. या केंद्रात काम करून विद्यापीठाची एम ए आणि पीचडी अशा (विद्यावाचस्पती) पदव्या मिळविता येतात.

धार्मिक ग्रंथ हा हिंदुत्ववाद्याचा एक मोठा खजिनाच आहे. ऋग्वेद हा बहुधा जगामध्ये लिहिलेला पहिला ग्रंथ असावा. त्याच्या जोडीला अथर्ववेद, सामवेद, यजुर्वेद असे अनेक ग्रंथ लिहिले गेले. या लेखनात पुढे अनेक ग्रंथांची भर पडत गेली. रामायण, महाभारत ही महाकाव्ये रचली गेली. अलिकडच्या काळात शाकुंतल, मेघदूत अशा काव्यांची भर पडली. हे सर्व संस्कृतमध्ये होते. याखेरीज प्रादेशिक भाषांमध्ये नवनवीन ग्रंथ निर्माण झाले. जसे मराठीत ज्ञानेश्वरी आणि तमिळभाषेत तिरूकुरळ. यांतील अनेक ग्रंथांचे इंग्रजीत अनुवाद करण्यात आले. अशा अनेक ग्रंथांचा साठा केंद्राच्या वाचनालयात आहे. आजूबाजूच्या कपाटात

प्रार्थनेत ईश्वर आपले ऐकत असतो, तर ध्यानात ईश्वराचे आपण ऐकतो.

ठेवलेल्या पुस्तकांच्या गराड्यातच आम्ही बसलेला होतो आणि एवढी मोठी ग्रंथसंपदा पाहून आश्‍चर्य करीत होतो.

श्री. शौनक दास नावाचे एक गृहस्थ या केंद्राचे प्रमुख आहेत. ते जन्माने आयरिश असून त्यांचे मूळचे नाव वेगळेच आहे. हिंदुत्वाच्या विचारसरणीने प्रभावित होऊन त्यांनी धार्मांतर केले. हिंदू झाल्यावर त्यांनी शौनक दास असे भारतीय नाव धारण केले. भारतीय विचारसणींचा त्यांचा चांगला अभ्यास आहे. हिंदुत्वाचे एक वैशिष्ट्य सांगा, असे त्यांनी आम्हांला विचारले. तेव्हा आमची तारांबळ उडाली. ते ओळखून त्यांनी सांगितले की हिंदुत्व कोणावरही विजय मिळवायला सांगत नाही. जमीन, गुरे, संपत्ती यावर विजय न मिळविता आपल्या मनावर विजय मिळवा, असे हिंदुत्व सांगते. हे जीवनाचे महत्त्वाचे सार आहे. हे आम्हांला त्यांनी पटवून दिले. त्यानंतर अनेक विषयावर त्यांच्याशी चर्चा झाली आणि आम्ही बाहेर पडलो. बाहेर पडण्यापूर्वी, त्यांचे आभार मानण्यास आणि त्यांना भारतात येण्याचे निमंत्रण देण्यास मात्र आम्ही विसरलो नाही.



**केंद्र संचालकांशी चर्चा**

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा वैभव नगरी,
कल्याण शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे – ४२१२०४

## *विस्मरणातल्या म्हणी*

- हळकुंडाच्या गळ्यात शेळकुंड
- अळणी खातंय आणि लवंग मागतंय
- अक्कल नाही काडीची आणि गाठ सुटेना नाडीची
- चप्पलानं मारलं, तर म्हणं फुलानं मारलं
- आपले आपल्याला वाखाणी जग देते गाऱ्हाणी
- आपले खुळे तर रडावे, दुसऱ्याचे खुळे तर हसावे
- आपले नाक कापून दुसऱ्यास अपशकुन
- आपले नाही धड आणि शेजाऱ्याचा कड
- आपल्या कानी सात बाळ्या
- आपुले रे हाती आपले प्राक्तन। घडवू तेथे ध्यान घडतसे।
- आयत्या पिठावर रांगोळी
- आरशात पाहणाराचे तीन प्रकार – नर, वीर आणि वानर
- आला गेला, गोसावी दाढेला दिला
- आला भेटीला, धरला वेठीला
- आला वारा, गेला वारा, कोण कुणाचा सोयरा–धायरा?
- आले मी नांदायला अन् मडके नाही रांधायला
- आशेचे शेत शंभराला घेतले काय, विकले काय, सारखेच
- आषाढी तट, श्रावणी भट, भादवी कुणबट
- आदळून जेवण किळचून दान
- आधल्या घरचे मधल्या घरी आणि भिंतीवरून कारभार करी
- आधी अंबरा सोन्याचा होऊ दे, मग ठेच लागली तरी चालेल

**– संकलित**

कोणताही माणूस तोपर्यंत दुःखी होत नसतो, जोपर्यंत तो स्वतःला दुःखी मानत नाही.

# श्रीमत् भगवद् गीता - अध्याय चौदावा
## विषय : गुणत्रय विभाग योग

*कै. शंकरराव मठांनी दिशासाठी दिलेल्या लेखमालेतील १४ व्या अध्यायावरील हा लेख. या लेखाच्या माध्यमातून कै. मठांना आम्ही विनम्र अभिवादन करतो. – संपादक*

**श्लोक १ ते ४ ज्ञानाची महत्ता – प्रकृती व पुरुष यांजकडून जगाची उत्पत्ति**

श्रीकृष्ण म्हणतो, ज्या ज्ञानाच्या आधारे सर्व मुनींनी या लोकीच परम सिद्धि प्राप्त केली. ते सर्वोत्तम ज्ञान पुनः मी तुला सांगतो. जे ह्या ज्ञानाचा आश्रय करुन माझ्या समान धर्माला प्राप्त झाले, ते उत्पत्तीच्या वेळी जन्मही घेत नाहीत आणि प्रलयकाळी कष्टही भोगीत नाहीत.

हे भारता, महत् ब्रह्म अर्थात् माझी प्रकृतीच माझा गर्भ ठेवण्याचे स्थान आहे. तिच्या ठायी मी गर्भ ठेवितो. तिच्यापासून सर्वभूतांची उत्पत्ती होते. हे कुन्तीपुत्रा, सर्व योनीत ज्या मूर्ती उत्पन्न होतात. त्या सर्वांचे उत्पत्तिस्थान महत् ब्रह्म अर्थात् माझी प्रकृतीच आहे आणि मीच तिच्या ठिकाणी बीज पेरणारा पिता आहे.

**श्लोक ५ ते १८ सत्व, रज, तम – या त्रिगुणांचे वर्णन**

हे महाबाहो सत्त्व, रज आणि तम हे गुण प्रकृतिपासून उत्पन्न होतात. देहातील अविनाशी देहधारी जीवाला हे बांधतात. हे निष्पाप यात आरोग्य व प्रकाश देणारा सत्त्वगुण आपल्या निर्मळतेमुळे आत्म्याला सुखाने आणि ज्ञानाची बांधतो. हे कुंतीपुत्रा अर्जुना, रजोगुण प्रेम करणारा असल्याने तो तृष्णा आणि आसक्ती उत्पन्न करतो, असे तू समज. तो देहधारीला कर्मपाशाने बांधतो. हे भारत कुलोत्पन्न तामोगुण ती सर्व देही याना मोहात घालणारा आहे आणि तो मोह आणि अज्ञान उत्पन्न करतो. तो देहीला प्रमाद आळस आणि निद्रा यांनी बद्ध करतो. हे भारता, देहधारीला सत्त्वगुण सुखात, रजोगुण कर्मात आणि तमोगुण ज्ञानाला आच्छादित करतो.

सत्त्व गुण रज आणि तम या गुणांचा पराजय करुन स्वतः प्रभावित होतो. तसाच रजोगुण, सत्त्व आणि तम यांचा पराजय करून स्वतः प्रभावी होतो. त्याच प्रमाणे तमोगुण सत्त्व आणि रजोगुणाला जिंकून स्वतः प्रभावी होतो. जेव्हा या देहात सर्व इंद्रियांच्या ठायी प्रकाश आणि ज्ञान उत्पन्न होतो; तेव्हा सत्वगुण वाढला आहे असे समजावे. हे भरत श्रेष्ठा लोभ, प्रवृत्ति, सर्मारंभ, इंद्रियांची अशांती आणि इच्छा ही लक्षणे रजोगुण वाढल्यानंतर होतात. कुरुपुत्र अर्जुना, प्रकाशाचा अभाव, कर्म करण्याची प्रवृत्ती न होणे, प्रमाद आणि मोह ही चिन्हे तमोगुण वाढल्यानंतर होतात.

सत्त्वगुण वाढल्यानंतर जो देहधारी देह सोडतो, तेव्हा तो उत्तम ज्ञानाच्या निर्मळ लोकांना प्राप्त करतो. रजोगुण वाढला असता, जेव्हा मृत होतो तेव्हा तो कर्मसंगी लोकात जन्म घेतो. त्याच प्रमाणे तमो गुणाची वृद्धी झाल्यानंतर मृत्यू झाला तर मूढ योनीत उत्पन्न होतो. सत्कर्माचे फळ सात्त्विक आणि निर्दोष असते. रजोगुणाचे फळ दुःख आणि तमोगुणाचे फळ अज्ञान आहे. सत्त्व गुणापासून ज्ञान, रजोगुणापासून लोभ आणि तमोगुणापासून प्रमाद मोह आणि अज्ञान उत्पन्न होते. सात्त्विक उन्नत होतात, राजसमध्ये राहतात आणि तमोगुणी अधोगतीला जाऊन खाली पडतात.

---

आपल्याला जो उपद्रव नकोसा वाटतो तो इतरांना देऊ नये.

**श्लोक १९ ते २७ भगवत् प्राप्तीचे उपाय, गुणातीताचे वर्णन**

या गुणाशिवाय दुसरा कोणी कर्ता नाही असे द्रष्टा प्रत्यक्ष पाहतो आणि गुणांच्या पलीकडे असणाऱ्या आत्म्याला पाहतो तेव्हा तो माझ्या स्वरूपाला प्राप्त होतो. देहधारी ह्या देहापासून उत्पन्न होणाऱ्या तिन्ही गुणांच्या पार होऊन जन्म मृत्यू जरा आणि दुःख यापासून मुक्त होतो तेव्हा तो अमरत्वाला प्राप्त होतो.

अर्जुन म्हणतो, हे प्रभो ह्या तीन गुणांच्या पलीकडे असणाऱ्यांची ओळख कोणत्या लक्षणांनी होते? तो कसा वागतो? आणि तो या तीन गुणांच्या पलीकडे कसा जातो?

श्रीकृष्ण सांगतात, हे पंडुपुत्रा प्रकाश (सत्त्व) प्रवृत्ती (रज) आणि मोह (तम) हे तिन्ही गुण प्राप्त झाल्यानंतर जो दुःख मानीत नाही आणि हे तिन्ही निवृत्त झाल्यानंतर जो त्यांची अपेक्षा करीत नाही तो उदासीन राहून या गुणांपासून चळला जात नाही. गुणच आपले कार्य करतात. असे समजून जो स्वस्थ राहतो आणि कंपित होत नाही, जो सुख दुःख सम मानतो, जो आपल्या ठिकाणीच आनंदित असतो, माती-दगड-सोने यांना तो सारखे समजतो, जो प्रिय अथवा अप्रिय यांची प्राप्ती झाली तरी सम राहतो, जो धैर्यवान असतो, ज्याला आपली निंदा आणि स्तुती सारखीच वाटते, ज्याला आपला मानापमान सारखाच असतो, शत्रुमित्राशी जो समतेने वागतो, सर्व कार्यारंभाचा जो त्याग करतो. तोच या तीन गुणांच्या पलीकडे होतो.

जो माझी एकनिष्ठ भक्तिभावाने सेवा करतो तो या गुणांचे उल्लंघन करून ब्रह्माचे महत्त्व प्राप्त करून घेण्यास योग्य बनतो. अमर आणि अव्यय ब्रह्माचे शाश्वत धर्माचे, आणि उच्च सुखाचे स्थान मीच आहे.

या अध्यायात सत्व, रज, तम हे तीनही गुण विश्वातील संपूर्ण पदार्थात कसे आहेत याचे वर्णन केले आहे. प्रत्येक गुणाचे लक्षण काय आणि परिणाम काय हेही सांगितले आहे. हे गुण मनुष्यातही आहेत आणि मनुष्याचा स्वभाव यांच्यापासून बनतो. मनुष्याची उन्नती अवस्था व दुरवस्था सर्वस्वी या गुणांवर अवलंबून आहे. यासाठी त्रिगुणांची माहिती असणे आवश्यक आहे. याची ज्ञानाने साधकाला परमसिद्धी मिळते आणि परमेश्वराच्या गुणधर्मांना साधक जवळ करून नराचा नारायण होऊ शकतो.

शुद्ध बीज - संपूर्ण विश्वाचा एकच स्वामी परमपिता परमात्मा आहे आणि त्याची मूळशक्ती तिला प्रकृती वा आदिशक्ती म्हणतात. या उभयतामुळे संपूर्ण सृष्टीची उत्पत्ती होते. आपल्या सर्वांच्या ठिकाणी त्या परमपित्याचे बीज आहे. माझा विकास होऊन मी ही माझ्या पित्यासारखा म्हणजे परमात्मासारखा होणार आहे. मी आज नर आहे, पुढे नारायण होणार कारण माझ्या ठिकाणी त्या नारायणाचे वीर्य कार्य करीत आहे. मी जीव आहे, शिव होणार. यावरून परमात्मा व प्रकृतीपासून उत्पन्न झालेले आम्ही कोण आहोत, कोण होणार? हा महासिद्धांत ध्यानात येईल. प्रत्येक मनुष्य हा सिद्धांत ओळखून नराचा नारायण होऊ शकेल. असा विश्वास गीतेने दिला आहे. या उपदेशाप्रमाणे आतापर्यंत अनेक साधु, संत, ऋषि, मुनी सर्व परम सिद्धीला प्राप्त झाले आणि परमात्म्याच्या साधर्म्याला युक्त झाले त्याचे हे कारण आहे. हे शुद्ध ज्ञान हदयात बाळगून यांचे चिंतन करावे. मी परमात्मशक्तीने संपन्न आहे आणि परिपूर्ण होऊन परमेश्वराच्या साधर्म्याला युक्त होईन हाच विश्वास मानवाच्या खऱ्या उन्नतीचे कारण आहे.

रजः सामर्थ्य - गीतेप्रमाणे रजही आत्मशक्तीचे सामर्थ्य आहे. परमात्म्याचे बीज आदिशक्तीचे रज यांचा शुभ असा संयोग झाला आहे. अशा शुद्ध बीजापोटीच निर्माण होणारी संतती उज्जवल होत असते. या आदिशक्तीच्या ठिकाणी तीन गुण आहेत. सत्त्व सुखाने देहाला बद्ध करते, रज विविध कर्म प्रेरक आहे, तम-

इतरांना दुखवून मिळवलेला फायदा जास्त काळ आनंदी ठेवू शकत नाही.

आलस्य, प्रमाद यांना देहदानाला बांधून टाकते. याप्रमाणे या तीन गुणांनी मानव बद्ध होतो. यांतून सुटका करून घेणे हाच पुरुषार्थ होय. हे बंधन जाचक कसे हाणार नाही व ती साहायभूत कशी होतील, हाच विचार प्रामुख्याने करणे आवश्यक आहे.

तीन गुणांचे स्वभाव - सत्त्व-निर्दोष, निर्मळ, निष्कलंक, अनामय, सुख, ज्ञान, वैराग्य, निष्काम, उत्साह, शांती इत्यादी. रज-रोष, कलंक, दुःख, कर्म प्रवृत्ती, तृष्णा, सदैव प्रयत्न लोभ, सकाम कर्म, अशम, प्रवृत्ती, मध्यम स्थिती. तम- आलस्य निद्रा, अज्ञान, कर्महीनता मोह, प्रमाद, अप्रवृत्ति, अशांत अधोगती.

हे तीनही गुण कमी अधिक प्रमाणात प्रत्येक व्यक्तीच्या ठिकाणी राहतातच. प्रत्येक व्यक्ती तमोगुणाच्या आधारे विश्रांती घेते. रजोगुणामुळे प्रयत्नशील राहते आणि सत्त्वगुणाच्या योगे आनंदाचा अनुभव घेते. याप्रमाणे हे तीनही गुण मनुष्याचे साहायकारी होतात. मनुष्याची सर्व कार्ये या गुणांमुळेच होतात. परंतु, माणसाने याच्या आधीन होता कामा नये. यांच्याकडे द्रष्टा स्वरूपात पहावे व आपले स्वातंत्र्य अनुभवावे. गुणांच्या आधीन न होता त्यांच्याद्वारे होणाऱ्या कर्माकडे तिऱ्हाइतासारखे पहावे व आपले स्वातंत्र्य अनुभवावे. आपले स्वातंत्र्य आबाधित टिकावे, असे ज्यांना वाटते त्याच्यासाठी ही खास युक्ती आहे.

कालांतराने साधकच सिद्ध होतो व त्या अवस्थेत तो या त्रिगुणांचे कार्य पहात असतो. सत्त्वांपासून निर्माण होणारा प्रकाश आणि ज्ञान, रजोगुणापासून होणारा लोभ आणि कर्म, तमापासून निर्माण होणारा प्रमाद, मोह आदी तो पहात राहतो, तो तटस्थ राहतो. याचा आदर वा अनादर तो कधी करत नाही. हे गुण आपले कार्य करीत आहेत. त्यांच्याशी आपला संबंध तो प्रस्थापित करू इच्छित नाही. हा सारा प्रकृतीचा खेळ आहे व ती तशीच खेळणार असे समजून कोणत्याही गुणांच्या कर्माबद्दल ईर्षा, असूया, द्वेष आदि विकारांनी तो भारला जात नाही व त्याची बुद्धीही चंचल होत नाही. या गुणांचा वेग कितीही वाढो तो एखाद्या पर्वतासारखा स्थिर राहतो.

सुख दुःख, प्रिय-अप्रिंय, निंदा-स्तुति, मान-अपमान, शत्रू-मित्र, सोने-माती, इत्यादिकांचा लाभ झाल्याने तो हुरळून वा खचून जात नाही. त्याची समतोल वृत्ती ढळत नाही. संकटकाळीदेखील त्याची बुद्धी विपरीत होत नाही. झंझावाताने पर्वत हालत नाही, त्यासारखा हा दृढ राहतो. खऱ्या अर्थाने हाच गुणांचा स्वामी होतो व त्यामुळे त्यांच्या पलीकडे तो राहू शकतो व त्यानंतर तो ईश्वर भावाने मुक्त होतो.

अनन्य भावाने ईश्वर भक्ती करणाराही अशाच प्रकारे ईश्वर भावाने युक्त होतो. कारण, अमृत सुख आणि ब्रह्म यांचा तो एक आधार आहे. तो आधार याला प्राप्त होतो, म्हणजेच ईश्वर भावाने हा युक्त होतो.

**कै. शं. बा. मठ**
ठाणे

●●●

### *विनम्र अभिवादन !*



*दिशामध्ये विपुल लेखन करणारे व्यासंगी अभ्यासक शंकरराव मठ यांचे मार्च २०१३ मध्ये निधन झाले. दिशामध्ये त्यांनी अनेक विषयांवर निष्ठेने अभ्यासपूर्ण लेख लिहिले. संस्कृत साहित्य, भगवद्गीता, संत साहित्य यावरील त्यांचे लेख अतिशय संग्रहाय्य आहेत. त्यांच्या कृतीस अभिवादन!*

# साहित्य - जगत

*साहित्य-जगत / पुस्तक परिचय या लेखांमध्ये अनेक पुस्तकांचा परिचय आम्ही देतो. आपल्या वाचनात असे अविस्मरणीय पुस्तक आले तर त्याचा परिचय पाठवावा; योग्य वाटल्यास दिशाच्या अंकात घेऊ - संपादक*

**एक वाचनीय माहितीपूर्ण पुस्तक - चांगलं मरण (अर्थात मृत्यूवरती बोलू काही...)**

लेखक कमलाकर देवधर, 'ग्रंथाली' (ग्रंथाली ज्ञानयज्ञ म्युनिसिपल स्कूल इमारत, टोपीवाला लेन, डॉ. भडकमकर मार्ग, पोलीस स्टेशनसमोर, ग्रँटरोड, मुंबई - ४००००७ संस्थेने हे माहितीपूर्ण पुस्तक १९.२.२००९ रोजी प्रकाशित केलेले आहे.

सदाचाराच्या चार आश्रमांपैकी ब्रह्मचर्य व गृहस्थ ही जीवनाची कला, तर वानप्रस्थ व संन्यास ही मरणाची कला किंवा मृत्यूची ओळख. आपली संसारिक जबाबदारी पुढील पिढीच्या हाती सुपूर्द करणे म्हणजे जीवनाची कला आणि मृत्यू यायचा झाल्यास त्याचा हसऱ्या चेहऱ्याने स्वीकार करणे ही मरणाची कला. चांगले मरण हे चांगल्या जीवनानंतर येते असे म्हणता येईल. मनोगतात लेखक म्हणतोः

'मृत्यू' या विषयावर मुद्दाम कोणी लिहीत नाही व बोलत नाही. मनात आले तरी ते तोंडावाटे बाहेर पडेलच असं नाही. ओळखीचं कोणी मरण पावल्यास 'तो गेला' अस म्हटलं जातं. जणू काही मरण हा शब्द निषिद्ध मानला जातो. म्हाताऱ्या माणसांच्या कंपूमध्ये नुकत्याच निवर्तलेल्या स्नेह्याबद्दल 'कसा गेला? काय झाल होतं? इ. जुजबी संभाषण ऐकू येतं. अर्ध्या गोवऱ्या ओंकारेश्वराला गेलेल्यांच्या कळपातदेखील मृत्यूसंबंधी वस्तुनिष्ठ, तात्त्विक, गंभीर विचार होत नाही. खरं तर सर्व प्राणिमात्रांच्या इहलोकातील प्रवासाचा अपरिहार्य शेवट म्हणजे मृत्यू. तो एवढा दुर्लक्षित रहावा हे आश्चर्यच आहे!' 'आयुष्यावर बोलू काही' अशा कॅसेट किंवा सी. डी. मिळतील पण मृत्यूबद्दल काही बोलायचं आहे, पण मी बोलणार नाही' अशी सर्वसामान्य भूमिका दिसते. साहित्यिकांच्या किंवा विचारवंतांच्या लिखाणात मृत्यूवर तुरळक भाष्य आढळतात, परंतु ते सर्व आध्यात्मिक किंवा चिंतनपर आहे.'

लेखक स्वतः विकृतीशास्त्राचा अभ्यासक. त्यांची २०/२५ वर्षे मुंबईला सायन हॉस्पिटलसारख्या मोठ्या रुग्णालयात नोकरीत गेली. तिथे रोज सरासरी दहा रुग्ण मरण पावतात. त्यांतील बहुतेक त्यांच्या डोळ्यांखालून जात, म्हणून त्यांना मृत्यू या घटनेविषयी फार कुतुहल वाटत असे. यकृताच्या विकृतीचा अभ्यास करण्यासाठी १९७३ मध्ये त्यांना राष्ट्रकुल शिष्यवृत्ती मिळाली होती. मुंबई विद्यापीठाचे पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे ते शिक्षक. त्यांचे शंभर शोध निबंध प्रकाशित झाले आहेत.

**'सकस लेखन'** पुस्तकातील प्रत्येक प्रकरणातून उद्‌बोधक व विचार प्रवर्तक माहिती दिलेली आहे. 'स्मशानातच मृत व्यक्तीबद्दल भाषण करण्याची प्रथा मराठी भाषेचे शिवाजी विष्णुशास्त्री चिपळणूकर यांच्यापासून रुढ झाली, असे पृ.२७ वर म्हटले आहे.

'ब्रिटिश मेडिकल जर्नल' या जगप्रसिद्ध साप्ताहिकानं २००३ साली What is good death (चांगलं मरण) याबद्दल एक विशेषांक प्रसिद्ध केला होता. त्यावर बरीच चर्चा झाली. सर्वसाधारण माणसंदेखील मृत्यूविषयी किती खोलवर व गंभीर विचार करतात, ह्याचां तो पत्रव्यवहार हे उत्तम उदाहरण आहे. मनोगताच्या शेवटी त्यांनी एक सुंदर कविता उधृत केली आहे. ती अशी :-

Twilight and the evening bell
After that the dark
Let there be no sadness of farewell
When I embark

**पुस्तकाचे अंतरंग**

९९ पृष्ठाच्या (मूल्य रु.५०/- फक्त) या पुस्तकात १० प्रकरणे आहेत. त्यांची नावे (मथळे) अशी :- १) 'उद्घोष' २) 'पहिला मृत्यू' ३) 'मृत्यूचे शास्त्र' ४) 'मृत्यूचा बागुलबुवा' ५)'मृत्यूचे मिथ्यक' ६) 'मृत्यूचे कर्मकांड' ७) 'वानप्रस्थ' ८) 'मृत्यूची रुपे' ९) 'चांगले मरण' १०) 'चांगले जीवन'. या सर्व प्रकरणांतून मृत्यू कसे येतात त्या विषयी सर्वसामान्य माणसाचे विचार 'मृत्यूचे कर्मकांड कसे आहे' अंत्यसंस्काराच्या विविध पद्धती, मृत्यूचे शाखा समाचाराला जाणाऱ्या विविध, पद्धती इ. इ. माहिती व प्रबोधपर विचार सांगितलेले आहेत. 'चांगले मरण' या प्रकरणातील चांगले विचार पहाः

मृत्यूला घाबरुन चालत नाही. उलट त्याच्या स्वागताची तयारी करावी लागते. Death is one attribute you are created with Death is a part of you. Your Life's contramos task is to build four death (आयुष्यभर मरणाला समोर ठेवून, भिऊन नव्हे) वर्तणूक ठेवली तरच मृत्यूचा कळस विनासायास गाठता येतो..

उत्क्रांतीमध्ये मानवजन्म हा आतापर्यंत परमोच्च बिंदू समजला जातो. आपल्या बुद्धीने व कर्माने जीवन जसे सत्कारणी लावावे, तसेच आपल्या जाण्याने मरणसुद्धा सत्कारणी लावावे. एकंदरित सर्व पुस्तकच उत्तम आहे. त्यांतल्या त्यांत शेवटची दोन प्रकरणे 'चांगले मरण' व 'चांगले जीवन' ही सरसच आहेत. प्रत्येकाने हे पुस्तक वाचावेच. त्यातून व्यक्त झालेले विचार अंगी बाणवावेत शाळा, कॉलेजच्या ग्रंथालयांनी व खासगी वाचनालये, ग्रंथालये यांनी ते अवश्य संग्रही ठेवावे. लेखक व प्रकाशक यांना धन्यवाद!

**सुप्रसिद्ध पुरातत्त्व शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. मधुकर केशव ढवळीकर यांची दोन उत्कृष्ट पुस्तके**

सुप्रसिद्ध पुरातत्वशास्त्रज्ञ डॉ. मधुकर केशव ढवळीकर (श्रीवत्स, ३३, नवकेतन सोसायटी, कोथरुड, पुणे - ४११०२९) यांची दोन उत्कृष्ट पुस्तके अशी :

१) 'आर्यांच्या शोधात पृ.१३६, मूल्य रु.१००/- आवृत्ती पहिली एप्रिल २००८, दु.आ. एप्रिल २००९ , दुसरे पुस्तक 'महाराष्ट्राची कुळकथा' (पृ.१४८, मूल्य १४०/- आवृत्ती १ ली - जुलै २०११) दोन्ही पुस्तकांतील प्रस्तावना व मलपृष्ठावरील माहिती पुढीलप्रमाणे :

**'आर्यांच्या शोधात' या पुस्तकाचे अंतरंग**

या पुस्तकाची ६ प्रकरणे अशा १) आर्यः एक यक्ष प्रश्न २) ऋग्वेदातील संस्कृती ३) आर्यांचे पुरातत्त्वीय अवशेष ४) वैदिक आर्यांचे पूर्वज ५) आर्याची स्थलांतरे ६) उपसंहार शिवाय दोन परिशिष्टे : १) 'संदर्भ' मध्ये प्रत्येक प्रकरणातून ज्या पुरातत्व वेत्त्यांची / संशोधकांची नावे आली आहेत. त्याची यादी २) संदर्भ ग्रंथ - यामध्ये देशी विदेशी ग्रंथकर्ते व त्यांच्या ग्रंथांची नावे आहेत (सुमारे ७०).

आर्याचा प्रश्न हा मानवी इतिहासातील सर्वात जटिल समस्या आहे. ते कोण होते, कोठून आले आणि त्यांचा काळ याबद्दल विद्वानांत प्रचंड वाद आहे. परंतु त्याची समाधानकारक उकल अद्याप झालेली नाही. असे असले तरी स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय उपखंडात जी पुरातत्त्वीय उत्खनने झाली आहेत. त्यावरून दिसून येते की, सुमारे सात हजार वर्षांपूर्वी काही नवे लोक भारतात आले आणि सांस्कृतिक विकास सुरू झाला. सिंधुच्या खोऱ्यातून ते सरस्वतीच्या खोऱ्यात स्थिरावले. तेथे सिंधु संस्कृती उदयास आली. परंतु चार हजार वर्षापूर्वी पर्यावरणातील प्रतिकूल बदलामुळे तिचा ऱ्हास सुरु झाला.

ही उत्तर सिंधु संस्कृती वैदिक आर्यांची असावी असा परिस्थितिजन्य पुरावा आहे हे पुस्तक आहे, त्याचीच विस्तृत चर्चा करणारे. प्रस्तावनेत डॉ. ढवळीकरांनी पुस्तकाचे श्रेय श्री. दिलीप माजगावकरांना यांना दिले आहे. ते निरनिराळ्या विषयांवर लिहिण्यास लेखकांना उद्युक्त करतात. त्यांना पुरातत्त्वात विशेष रस आहे. काही वर्षांपूर्वी ते आमचे इनामगाव उत्खनन पाहण्यासाठी आले असता मी पुरातत्त्वावर लिहावे असे त्यांनी मला सांगितले.

**महाराष्ट्राची कुळकथा : अंतरंग**

राजहंस प्रकाशन, १०२५, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०, फोन नं.:०२०-२४४७३४५९ या पुस्तकात सात प्रकरणे आहेत ती अशी - १) पुरातत्त्वाची रूपरेषा २) अश्मयुग ३) आद्य शेतकरी ४) महापाषाणीय घोडेस्वार ५) सातवाहन कालीन संपन्न गृहपत्ती ६) वाकाटक कालीन, रसिक नागरक ७) महाराष्ट्राचे ग्रामिणीकरण शिवाय 'संदर्भ ग्रंथ'मध्ये २१ मराठी-इंगजी ग्रंथांची नावे आहेत.

**महाराष्ट्राविषयीची ऐतिहासिक माहिती**

महाराष्ट्र होता कसा शेकडो, हजारो वर्षांपूर्वी ? कोणाची वस्ती होती तेंव्हा या भूमीवर? कसे जगत होते? कसे रहात होते ते लोक, काय होती त्यांची जीवन पद्धती, त्यांच्या चालीरीती? महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या उत्खननातून मिळालेल्या ठोस पुराण्यांच्या आधारे सांगितलेली मोठी मनोरंजक माहिती या पुस्तकात आहे. प्रस्तावनेत डॉ. ढवळीकर म्हणतात.

'भारतीय पुरातत्त्व संशोधनात स्वातंत्र्योत्तर काळात लक्षणीय प्रगती झाली आहे. त्याची थोडी फार कल्पना सामान्य वाचकांना व्हावी, म्हणून दिलीप माजगावकरांनी माझ्याकडून 'सिंधू संस्कृती' आणि 'आर्यांच्या शोधात' ही पुस्तके लिहून घेतली. त्यांना मिळालेला प्रतिसाद पाहून माजगावकरांनी आता पुढे काय असा प्रश्न केला. त्यावेळी प्रस्तुत विषयाची कल्पना मी त्यांच्यापुढे मांडली. त्यांना ती पटली आणि या पुस्तकाची निर्मिती झाली.'

लेखक डॉ. मधुकर केशव ढवळीकर आणि प्रकाशक दिलीप माजगावकर यांनी उत्कृष्ट पुस्तकांची निर्मिती केली, याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

**श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

## विनम्र अभिवादन !



गतवर्षी २६ मार्च रोजी विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ कार्यकर्ते व सदस्य मा. ना. पाटील अनंतात विलीन झाले. विद्या प्रसारक मंडळाच्या प्रगतीमध्ये त्यांचे मोठे योगदान होते. १९ जुलै १९२६ रोजी नाशिक येथे त्यांचा जन्म झाला. विद्या प्रसारक मंडळाची त्यांना विनम्र श्रद्धांजली.

# 'विश्वभ्रमंती' एक अनोखा दिवाळी अंक

*पर्यटन विषयक एका दिवाळी अंकाच्या प्रकाशनाच्या भाषणातला हा भाग. पर्यटनातील बदलते प्रवाह यातून सूचित होतात. – संपादक*

''मराठी प्रवास वर्णन लेखक वाचक मंच'' या अनोख्या मंचाने प्रकाशित केलेला, त्यांनीच लिहिलेला दिवाळी पर्यटन विशेषांक २०१२.

दोन तीन वर्षापूर्वी एका दिवाळी अंक स्पर्धेची मी परीक्षक होते. साधारण तीस एक अंक तेव्हा माझ्याकडे आले होते. त्यात एकही अंक माहितीतला नव्हता. म्हणजे स्त्री, माहेर, मेनका, अनुराधा, ललना, वसंत वगैरे वगैरे. सर्वच अंक नवीन, काही वर्षापूर्वी निघालेले होते. (म्हणजे, एक दोन वर्षातले) नावे पण मला आता सांगता येणार नाहीत. 'आम्ही डोंबिवलीकर आम्ही कल्याणकर' अशांसारखी नावे होती . काही दिवाळी अंकांनी लेखकांना विषय दिला होता. म्हणजे, आजचे चर्चेतले ज्वलंत विषय नातेसंबंध महागाई, भ्रष्टाचार, पाणी प्रश्न, लहान मुलांचे लैंगिक शोषण, मिळवत्या स्त्रीचे प्रश्न असे होते. दिवाळी अंक जसे नव्याने निघालेले, म्हणजे दिवाळी अंकापुरतेच होते; तसेच मासिक किंवा त्रैमासिक वगैरे नव्हते तसे लेखकही नवखे, अपरिचित होते. हे सर्व असे असले तरी काही अंक खरोखरच दर्जेदार, सकस वाचनीय होते एवढे खरे. कारण तीन नंबर लावायचे होते नि अंक दर्जेदार निघाले सहा–सात मग नंबर दोन–तीन विभागून बक्षिस दिले व उरलेले अंक उल्लेखनीय या सदरात बक्षिसपात्र ठेवले.

ही झाली गेल्या दोन तीन वर्षापूर्वीची गोष्ट पण २०१२ साली तर माझ्याकडे एक अनोखाच दिवाळी अंक घेऊन एक जण माझ्याकडे आले. त्या अंकाचे ते पहिलेच वर्ष होते आणि तया दिवाळी अंकाचा प्रकाशन समारंभ ठाणे महानगर पलिकेच्या सभागृहात दिवाळीपूर्वी मा. सभापती श्री. वसंतरावजी डावखरे यांच्या शुभहस्ते होणार होता. त्या प्रकाशन समारंभाला प्रमुख वक्ता म्हणून मला निमंत्रित करायला ते आले होते. निमंत्रणाचा मी स्वीकार केला. नि अंक चाळायला घेतला. दोन दिवसानंतर प्रकाशन समारंभ होता. तोपर्यंत अंक वाचून काढायला हवा होता, म्हणून दोन रात्री जागून मी अंक वाचून काढला. याआधी 'मुशाफिरी' हा प्रवास वर्णनपर दिवाळी अंक ठाण्याच्या व्यास क्रिएशन्सनेही काढला होता.

तुमचा दिवाळी अंक कुठला होता? तुम्हांला त्याबद्दलच सर्व सांगणार आहे. अंकाचे नाव 'विश्वभ्रमंती' दिवाळी २०१२ वर लिहिले होते. प्रवासाची आवड असणाऱ्या सर्वांसाठी निर्मिती मराठी प्रवास वर्णन लेखक वाचक मंच मूल्य १०० रु. अंकाचे संपादक – ठाणे वैभव दैनिकाचे संपादक श्री. मिलिंद बल्लाळ. मुखपृष्ठावर पृथ्वीच्या गोलात, निरनिराळ्या देश विदेशांतील महत्त्वाच्या वैशिष्ट्यपूर्ण स्थळांचे फोटो आपले लक्ष वेधून घेत होते. अनेक जाहिराती, पर्यटनपर लेख–फोटो यांनी अंक आकर्षक दिसत होता.

साधारण ९० च्या दशकापासून भारतीय अर्थव्यवस्थेचे नवे पर्व सुरू झाले. जीवनाकडे बघण्याचा भारतीयांचा, अगदी मराठी मध्यमवर्गीय माणसाचाही दृष्टिकोन पार बदलून गेला. जागतिकरण आणि मुक्त अर्थव्यवस्था यांचे पंख लाभलेल्या समाजाने विविध क्षेत्रांत भरारी घेतली. त्यामुळे पर्यटन क्षेत्रातही मोठी उलाढाल सुरू झाली. २१ वे शतक हे सेवा शतक म्हणून जाहीर झाले नि निरनिराळ्या पर्यटन कंपन्यांमध्ये 'ग्राहक देवो भव'

हे पर्यटन तत्त्व, उद्दिष्ट मानून ग्राहकांना जास्तीत जास्त सोयी, सुविधा, सेवा, सहकार्य देण्याची चढाओढच लागली. ट्रॅव्हल कंपन्यांचा तर अगदी सुळसुळाट झालाय. रोजचा पेपर उघडला की त्यात मजकुरापेक्षा (लेख, बातम्यांपेक्षा) पानोपानी दिसतात जाहिरातीच. केसरी, सचिन, भाग्यश्री, विहंग, मधुछंदा अशा कितीतरी ट्रॅव्हल कंपन्या अनेक आकर्षक सेवा सुविधा देऊन ग्राहकांना आपल्याकडे आकर्षित करीत आहेत.

पूर्वी फक्त दरवर्षी एकदा सुट्टीत मामाच्या गावी आजोळी जाणे नाहीतर शाळेच्या सहलीला जवळपास कुठेतरी जाणे माहीत होते. मग हनिमूनला जाणे सुरू झाले. जवळपास कुठेतरी चार दिवस जाणे, मौजमजा करणे तर कधी तीर्थक्षेत्री जाणे वगैरे सुरू झाले. पण, आता तर माणसाला जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्था यांचे पंख लाभले आहेत. लो. टिळकांनी 'गीता रहस्यात' ज्ञान आणि कर्म या दोन पंखांनी माणसाला विश्वाकाशात भरारी घ्यायची आहे सांगितले आहे. दोन्ही पंख आवश्यक, कुठल्याही एका पंखाने भरारी घेता येणार नाही हे सांगितलेले मनावर ठसले होते. पण आताच्या या संगणकीय युगात माणसाला हे नवीन पंख फुटले आहेत आणि त्या पंखांनी तो विश्वभ्रमंतीला निघाला आहे.

मध्यम वर्ग आता उच्च मध्यमवर्गीय झाला आहे. लहान मर्यादित कुटुंब, पती-पत्नी दोघंही नोकरी करणारे त्यामुळे हातात पैसा खुळखुळू लागलाय. त्यामुळे रोजच्या धकाधकीच्या जीवनात थोडासा चेंज, मनोरंजन, विश्रान्ती नवीन काही प्रदेश, देश, विदेश पाहणे हे आवश्यक झाले आहे. प्रवास म्हणजेच मोकळा श्वास, त्या प्रवासालाच आता 'पर्यटन' हे भारदस्त नाव पडले आहे. आजच्या युगात पर्यटनाचा चेहरामोहराच बदलला आहे. १९९० पासून पर्यटक आणि पर्यटन उद्योग सध्या नव्याने कात टाकून झळकू लागलाय. माहिती आणि तंत्रज्ञान- या संगणकीय पर्वामुळे पर्यटन एकदम सोपे झालेय. संगणकावर तुम्हांला जगातील कुठल्याही ठिकाणाची साद्यंत माहिती मिळते. अगदी कसे जायचे, कुठे उतरायचे, काय पहायचे, खर्च किती? किती दिवस लागतील? अगदी सगळी सगळी माहिती घर बसल्या मिळते आणि ट्रॅव्हल कंपन्या आहेतच ना दिमतीला. अगदी 'पिक अप फ्रॉम होम' पासून सेवा द्यायला. फक्त तुम्ही पैसे भरायचे बुकींग करायचे. बाकी प्रवास, फिरणे, रहाणे, खाणे उतरणे वगैरे व्यवस्था ते करणार शिवाय सोबत आपला माणूस घरच्या सारखी काळजी घ्यायला विचारपूस करायला. मग आणखी काय हवे! तुम्ही अगदी डोळे मिटून निर्धास्तपणे म्हणजे, डोळे उघडे ठेवून बघायचे सर्व प्रेक्षणीय पण जराही विचार, काळजी, चिंता न करता, मुक्तपणे फुलपाखरासारखे विहरायचे. त्यामुळे आता बालक-पालक, ज्येष्ठसुद्धा पर्यटनाला जाऊ शकतात. फक्त मनात जिद्द, उत्साह, इर्षा शारिरीक क्षमता, खिशात पैसा मात्र पाहिजे. मग तुम्ही अगदी विश्वभ्रमंती केलीच म्हणून समजा. सध्या काय शालेय मुलांसाठी वेगळी टूर, तरुणांसाठी गिरीभ्रमण वगैरे टूर, हनिमूनरर्स साठी वेगळी, ज्येष्ठांसाठी वेगळी, अगदी 'माय फेअर लेडी' ही तरुणी व गृहिणींसाठीही वेगळी टूर निघत असते. 'दुनिया झुकती है। झुकानेवाला चाहिये।' म्हणतात ते खोटे नाही.

तर असेच हे 'पर्यटन' विश्वभ्रमंती केलेले लोक पर्यटक एकत्र आले. त्यातील बऱ्याच पर्यटकांनी केलेल्या पर्यटनावर लेखनही केले. मग, आता ह्या लेखनाला वाचकही हवेत म्हणून त्यांनी 'मराठी प्रवास वर्णन लेखक वाचक मंच' ही संस्थाच स्थापन केली कल्याणमध्ये. कल्याण-ठाणे-डोंबिवली म्हणजे ठाणे जिल्ह्यातून त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. काहींनी तर या प्रवास वर्णनांची पुस्तके सीडीज् पण काढल्या. त्या एकमेकांना आदानप्रदान केल्या. हे सर्व अर्थात ह्या मंचामुळे शक्य झाले. त्या मंचाचीच पुढील संकल्पना म्हणजे हा २०१२ चा दिवाळी अंक. २००९ साली या मंचाची स्थापना

झालीय व तेव्हापासून मंचाची वाटचाल ही उत्कृष्टपणे सुविहित चालली आहे. 'विश्वभ्रमंती' हा दिवाळी अंक हे त्याचेच फलित म्हटले तरी चालेल.

दिवाळी, म्हणजे खाद्य फराळ व साहित्य फराळ म्हणजे दिवाळी अंकांची खैरात हा मराठी माणसाचा झाला. त्यामुळे दिवाळीच्या दीपोत्सवाबरोबर ह्या गोष्टीही आवर्जून असल्याच पाहिजेत.

मिलिन्द बल्लाळ यांच्या खमंग संपादकीयानंतरचा पहिलाच लेख म्हणजे भाजपचे आमदार कार्यकर्ते व विशेष त्यांचा उल्लेख करायचा म्हणजे उत्तम अभिनेते 'संन्यस्त ज्वालामुखी' या विवेकानंदाच्या झंझावाती जीवनावरील नाटकात 'राकृष्ण परमहंसांची' व्यक्तिरेखा जीवंत साकार करणारे नटश्रेष्ठ श्री. संजय केळकर यांचा, 'वारी अमेरिकेची' हा आहे. नंतर या दिवाळी अंकाचे प्रकाशक मंचाचे कार्याध्यक्ष डॉ. सुनील कवठे यांचा 'टिकली एवढी बेटं कॅनरी आयलंडस्' हा लेख आहे. 'पिरॅमिडस्' नावाचे त्यांचे पर्यटनाचे सी.डी.सह पुस्तकही प्रसिद्ध झाले आहे. याशिवाय यात 'मलेशियाची मांजर नगरी', 'अमरनाथ यात्रा', 'मनमोहक मल्लापुरम', 'सागर तळीचा बगिचा', 'चमचमणारी बेटं', 'नायगाराचे नादब्रह्म' 'मी पाहिलेला रशिया', 'थरार पृथ्वी प्रदक्षिणेचा' हा दिलिप दोन्दे यांच्या शिडाच्या होडीतून तेवीस हजार सागरी मैलांची पृथ्वी प्रदक्षिणा करणाऱ्या व जागतिक विक्रमवीरांच्या पंक्तीत स्थान मिळवणाऱ्या साहसी दर्यावर्दी कमान्डर श्री. दिलीप दोन्दे यांच्या सागरी सफरीवरच्या साहसी प्रवास वर्णनाचा लेख तीस वर्षापूर्वी त्रिखंडातला प्रवास मोटार सायकलने करणाऱ्या प्रवीण कारखानीस यांनी लिहिला आहे. एका जयेष्ठ नागरिकाने शिडाच्या होडीने एकट्याने केलेली ही विश्वभ्रमंती खरोखर एक आश्चर्यच आहे. असे हे सगळेच लेख ज्ञानात भर टाकणारे, वाचनानंद देणारे प्रेरणादायी असेच आहेत.

या मंचाने पर्यटन लेख स्पर्धा घेतल्या. मंचाची दरवर्षी एक दिनदर्शिकाही काढली, नवलेखिका मेळावा, वर्धापन दिन, पर्यटन विषयक व्याख्यानेही आयोजित करण्यात आली. प्रवास वर्णन पुस्तक स्पर्धाही घेण्यात आली. प्रगतीपर अशी या मंचाची वाटचाल खूपच उत्साहवर्धक व जोशात चालू आहे.

१९०९ साली म्हणजे १०३ वर्षापूर्वी पहिला मराठी दिवाळी अंक मनोरंजन मासिकाचे मालक, संपादक श्री. रघुनाथ काशिनाथ आजगावकर यांनी प्रकाशित केला आणि आज त्याला शतक उलटून गेल्यावरही ही वाटचाल जोशात जोमात चालू आहे. 'विश्वभ्रमंती' ह्या दिवाळी अंकाचा हा पहिलाच प्रयत्न खरोखर उल्लेखनीय, अभिनंदनीय आहे. या मंचाच्या ठाणे, भिवंडी डोंबिवली, अंबरनाथ इथेही शाखा निघाल्या आहेत. सभासदांची संख्याही वाढता वाढता वाढे अशी आहे.

त्यातून पर्यटक, लेखक वाचकही तयार होत आहेत ही उल्लेखनीय गोष्ट आहे. नवीन देश, प्रांत तिथली भाषा, संस्कृती, पेहराव, इतिहास रीतीरिवाज विचारसरणी आदींचे असंख्य पदर पर्यटनामुळेच उलगडतात व ज्ञानात भर पडते. मराठी माणूस मुळातच चिकित्सक आणि देश परदेश पर्यटन केल्यामुळे तो अधिकच समृद्ध नि ज्ञान संपन्न झाला. त्याचा आत्मविश्वास वाढला. जीवनाचा अर्थ त्याला नव्याने समजू लागला. पर्यटनाचा आनंद लुटायला माणसं घराबाहेर पडू लागली. नि त्यामुळे पर्यटन कंपन्याही कोट्यवधी रुपयांच्या उलाढाली करीत आहेत. पर्यटन उद्योगालाही तेजी, बरकत आली आहे. नव्याचा शोध घेण्याची मानवी महत्त्वाकांक्षा उद्या त्याला परग्रहावर ही पर्यटनासाठी एक नवे अवकाश निर्माण करील. त्याचीच ही नांदी असावी कदाचित! तुमच्या मंचाच्या इर्षा व उर्जेला माझा सलाम!

मी स्वतःही भारत भ्रमण केले आहे. कुरुक्षेत्री गेले असता तिथे मला मी गीतेची अभ्यासक आहे व 'सांगे

गीता' हे गीते वर सुलभ सोप्या भाषेत पुस्तक ही लिहिलेय. म्हणून मला कृष्णाने जिथे अर्जुनाला गीता सांगितली तिथे गीतेवर चार शब्द बोलण्याची अमूल्य संधी मिळाली. आज लोकांची मुले अमेरिकेत शिकायला किंवा नोकरी निमित्ताने जातात. तशी माझाही मुलगा अमेरिकेत आधी उच्चशिक्षणासाठी व नंतर कंपनीतर्फे गेला महणून मलाही अमेरिका सफर करायला मिळाली. त्यावरही 'अब की बारी अमेरिका वारी' हे पुस्तक लवकरच येत आहे. मंचाच्या उत्साही सभासदांनी हॉल फुलून गेला होता. तुमच्या 'विश्वभ्रमंतीला' हार्दिक शुभेच्छा देऊन मी माझे भाषण संपवते. मान्यवर व श्रोते यांचे ही धन्यवाद!

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्‌,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी - २५४१०१४०
भ्रमणध्वनी - ९३२४०४४७६४

●●●

## *या काही समस्यांचे काय?*

१. **बेकारी** : निल्सनच्या ताज्या पाहणीत भारतातील बेकारी वाढल्याचे म्हटले आहे. भारतात २००७ साली रोजगाराचा दर ७.८ टक्के होता. त्यात २०१० पर्यंत सुमारे २ टक्क्यांनी घट झाली.

२. **बालकामगार** : भारतात ४ कोटी बालकामगार आहेत. त्यात अशिक्षितांचे प्रमाण जास्त आहे. बहुतेक जण दोन-तीन वर्षांनंतरच शाळा सोडतात. यातील १२.६ कोटी मुले धोकादायक जागी काम करतात.

३. **दहशतवाद** : गेल्या काही वर्षांत दहशतवादात वाढ झाली आहे. काश्मीर, बेंगळूर, अहमदाबाद, जयपूरमधील घटनांमध्ये कित्येक निष्पाप बळी गेले. जागतिक आकडेवारीनुसार भारताला अशा हल्ल्यांचा जास्त धोका आहे.

४. **इन्फ्रास्ट्रक्चर** : भारताच्या प्रगतीत पायाभूत सुविधांचा अभाव हा खूप मोठा अडथळा आहे. येथील रस्त्यांची अवस्था दयनीय आहे. वीज-पाणी इ. सुविधाही पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत.

५. **दारिद्र्या व विषमता** : नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑर्गनायझेशननुसार एक चतुर्थांश भारतीयांची कमाई एक डॉलरपेक्षाही कमी आहे. देशातील एकपंचमांश व्यक्तींना पोटभर जेवण मिळत नाही.

६. **लोकसंख्या** : आज भारताची लोकसंख्या सुमारे १५० कोटीपेक्षा अधिक आहे. ही जगाच्या लोकसंख्येच्या एक षष्ठांश आहे. ही वाढती लोकसंख्या देशाच्या विकासाला बाधक आहे.

●●●

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ३**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत– संपादक*

**दिवस ७ वा : मारु चितली कपिलेश्वर मुक्काम : दत्तवाडा**

चहापान करुन मारु चितली सोडले. पुढे दोन दोन तीन तीन किलोमीटरवर गावे लागत गेली. कपिलेश्वर तीर्थ टाकून अलिकडून पुढे जायचा विचार होता. (माझा विचार मात्र तसा नव्हता) कारण कपिलेश्वर गावाच्या थोडे पुढे आहे व रस्ता गावातून वळतो; गावात ताक मिळाले व कपिलेश्वर येथे सदावर्ताचे जिन्नस त्याच घरातून जातात ही माहिती मिळाली. कपिल मुनींची ही तपोभूमर आहे. दर्शन अवश्य घ्या असे आग्रहाने सांगणे टाळता आले नाही व मैय्येच्या इच्छेनुसार दर्शन झाले.

न्याहारी केली नव्हती, तीर्थाजवळ मिळाले ते विकत घेऊन खाल्ले. पुढे वाटेत मैय्याच्या पात्रात स्नान केले. पात्र फारसे स्वच्छ नव्हते, कारण काठाजवळ पराग/जीव यांचा अखंड ओघ पाण्यावर वाहत होता. डुबीची वाळू घेऊन नावा पलिकडून या तीरावर येत होत्या. नावेचे हे दृश्य फार मनोहरी होते. फोटो घेणे शक्य झाले नाही. कारण कॅमेरा दूर तर मी किनाऱ्यावर होतो.

चार एक तास झाले की खांदे तक्रार करायला लागतात. त्यामुळे सॅक खाली ठेवायची संधीच मी पाहत असतो. आम्ही थांबलो तरी मंगल सॅक उतरवत नाही. इतकेच नाही तर ऊन असो, रस्ता धुळीचा असो, चढ असो, उतार असो, पुढे पुढे जात असते. अगदी एका लयबद्ध गतीने. आम्ही वारंवार थांबतो तेव्हा मी नाइलाज म्हणून उभी राहते, परंतु तिला सतत चालत राहून अधिकाधिक अंतर कापायचे असते; आमच्यामुळे अंतर २० कि.मी. वर कापले जात नाही. नाहीतर ती एकट्याने किमान ३०/३५ कि.मी. नक्की चालू शकते इतकी ऊर्जा तिच्यामध्ये आहे.

**निरीक्षण** : वाटेवर पुष्कळ रुईची झाडे दिसतात. याशिवाय छान पिवळ्या फुलांची रानझुडपे खूप दिसतात.

या भागात गाईगुरांची खिल्लारे , उसाच्या शेतांजवळ चरताना दिसली. शेळ्या मेंढ्याचे कळपच्या कळप आढळतात. इथली गुरे धष्टपुष्ट आणि देखणी आहेत.

दत्तवाड्याच्या अलिकडल्या गावातच मी शस्त्रे टाकून दिली होती. चार वाजले होते. इथे येईपर्यंत मी इतका थकलो होतो, की डोळे मिटत मिटत पाय ओढत चालत होते. या गावातही मुक्काम व कदाचित तयारी भोजनाची व्यवस्था होती. परंतु २/२ ।। कि.मी. वर दत्तवाडा आहे म्हणून तिथपर्यंत गेलो. दत्तपाडा गाठले तेव्हा ४ ।।। वाजून गेले होते.

माझी क्षमता कमी पडायला लागली आहे. खांदे कसतात आणि त्यातून ऊन्ह म्हटल्यावर मी संपून जातो. एकदा मुक्कामी गेलो, की माझा थकवा नाहीसा होतो कारण पाठीवर सॅक नसते. सकाळी भोजन झाले नव्हते. आणि आताही भोजनाची काही आशा नव्हती.

अखेर चूल पेटवून कोरा चहा केला. नंतर रेशन घेऊन खिचडी केली व आनंदाने जेवलो.

चूल पेटवायची सवय नव्हती. त्यामुळे अर्धा तास तर त्यातच गेला. मक्याची दाणे काढलेली कणसे होती. ती आणली, पाला गोळा केला, लाकडाच्या काटक्या

---

आयुष्यात समोर उभी ठाकणारी आव्हाने हबकून जाण्यासाठी नसतात. तर व्यक्तीला स्वतःचीच खरी ओळख करुन देणे, हेच या आव्हानांचे खरे उद्दिष्ट असते.– बर्नीस जॉन्सन रेगन

जमा केल्या पण चूल पेटेना, काड्या वाया जायला लागल्या. अखेर पेपर पेटवून प्रयत्न केला. दोन तीन कागद जाळल्यावर चूल पेटली. उंचीला दोन दोन विटा लावल्याने जाळ पोहोचत नव्हता. अर्धी खिचडी झाल्यानंतर ही गोष्ट लक्षात आली तेव्हां एक थर कमी केला. भरपूर पाणी होते, ते हळूहळू आटले व सुंदर खिचडी झाली.

दरम्यान रेशनमध्ये बरेच बटाटे मिळाले होते. दोन खिचडीत टाकले व पाच सहा बटाटे चुलीत खमंग भाजून खाल्ले.

जेवल्यानंतर लक्षात आले की, आज संकष्टी आपोआप उपास पार पडला. (नाही म्हणायला स्नानानंतर २०/२० ची बिस्किटे मात्र दुपारी खाल्ली होती.) परवा पुण्याच्या परिक्रमावासीने संकष्टीची सूचना केली तेव्हा अशोक म्हणाला होता, 'आम्ही संकष्टी वगैरे पाळत नाही.' ते ऐकून मैय्याने काहीतरी ठरविले, जे आम्हाला तेव्हा नाही पण आज, आता कळले.

दत्तवाडा आश्रम तटावर प्रशस्त आणि अगदी नर्मदा शांत आहे. आम्ही तीन आणि दुसरे दोन असे ५ जणच आज मुक्कामी इथे आहोत.

**दिवस आठवा : दत्तवाडा–गोलाव–बडदा–आवळी शेगांवा–दहिखेडा–पिपलोद–कुंडिया–कसरुद मुक्काम : कसरुद–माताजीवन आश्रम**

आज उन्हाचा ताप जाणवला नाही. दिवसभर खांद्याला रग जाणवली नाही. दोन दिवस खांद्यावर घेत असलेली सतरंजी/टॉवेल आज पॅकिंग म्हणून वापरला नाही, वाटेने भरपूर फोटो काढले. रस्ता चांगला होता, गावे २–२ कि.मी. वर असल्याने कंटाळा आला नाही. वाटेत दोघा तिघांनी भोजनाचा आग्रह केला. मुक्कामी रहा अशी भावपूर्ण विनंती केली. पण आम्ही पुढे निघालो. नदी किनारी दुपारी स्नानासाठी थांबलो परंतु चिरवलमय किनाऱ्यामुळे स्नान करता आले नाही (पिपलोद)

काहीतरी खायला घ्यावे म्हणून गावातील दुकानात गेलो, तर तिथे चहा विकत मिळण्याची व्यवस्था दिसली आणि चहा घेता आला. आजची दुपार भोजनाविना गेली.

पिपलोद नंतर कासरवदला जाण्यासाठी कुंडिया गावाच्या पुलावरून जाऊन उजवीकडे जायचा रस्ता मिळाला होता. पण वाटेत कुणीतरी शॉर्टकटने पाठविले आणि आम्हांला नदीचे कोरडे पात्र ओलांडण्यासाठी खूप दूर जाऊन उतरण शोधावी लागली. कारण नदीचा हा तट २० एक फूट उंच होता.



कासरवद गावातील Microwave  टॉवर दुरून दिसतो, त्या अनुरोधाने पलिकडे तीर चढलो आणि रस्ताच नव्हता. फक्त शेते. हाक दिल्यावर शेतातला मजूर स्वतःहून अर्धा एक कि.मी. आमच्याबरोबर आडवाटेने रस्ता काढत मुख्य रस्त्यापर्यंत आला.

कृतज्ञता म्हणून पैसे देऊ केले. तर तो ते घेईना अखेर त्याच्या मुलांसाठी बिस्किट पुडे दिले ते त्याने अगदी आढेवेढे घेत नाइलाजाने घेतले. खरे म्हणजे तो प्यायलेला होता; परंतु मैय्याचे संस्कार विसरला नव्हता.

मुक्कामी साध्वीच्या आश्रमात आम्हांला तयार खिचडी मिळाली. आश्रमात साध्वी नव्हत्या. परंतु एक माताजी, सेवा म्हणून निवृत्ती नंतर इथे वास्तव्याला आहेत. आम्ही तिघे, एक तरुण बाबा असे चौघेजण वस्तीला होतो.

माताजींनी साध्वींना फोनवर सांगितले की चार भगवान आज भोजनाला आहेत. दुपारी सात मूर्ती जेवून गेल्या होत्या आणि रात्री आता आम्ही चार भगवान!

हात पंपावर स्नान झाले. कपडे बुचकळून काढले. अंगाला, कपड्याला साबण नाही. परंतु अंगाला दुर्गंधी नाही आणि कपड्यांनाही दुर्गंधी नाही!

माताजींनी विचारल्यावर, आम्ही तिघे थोडे जाऊ असे सांगितले, तर बाबाजीने, 'पेटभर खाना खाएँगे' असे सांगितले. मंदिराची आरती आटोपल्यावर आमचे मैय्या पूजन झाले तो पर्यंत बाबाजी झोपून गेले. आम्ही पानावर बसलो परंतु बाबाजी यायला तयार नव्हते. माताजी म्हणाल्या की बाबाजी भरपेट जवणार होते; तुम्ही सुरुवात करा मी त्यांची समजूत काढून जेवायला घेऊन येते.

आज साध्वी आश्रमात नाहीत आणि कुणी उपाशी झोपणार नाही याची जबाबदारी त्यांच्या मागे माझ्यावर आहे. अन्न उरेल म्हणून नाही पण त्यांनी उपाशी झोपता नये. अन्न राहिले तर माझे भगवान बाहेर उभे आहेतच. पाहिले तर घराबाहेर तीन कुत्रे उभे होते.

माताजींच्या जागी मी असतो, तर अशा माजोऱ्या बाबाला आश्रमातून हाकलून दिले असते पण माताजींनी त्याला बोलावून आणले व जेवायला लावले. (नंतर बाबाजी म्हणाला, की एकदा झोपेचे आसन लावले की तो कशासाठीही उठत नाही, इतका निद्रेच्या तो आधीन आहे.)

**दिवस नववा : कासरवद–एकलहरा–राजघाट (मातीचा रस्ता) – रा. धा. बडवानी – अमल्यापानी – बावन जजा ( डांबरी सडक) ५ किमी. चा घाट : मुक्काम बावनगजा – जैन मंदिर धर्मशाळा**

सकाळी ७ वाजता कसरावदचा साध्वी आश्रम सोडून राजघाटाकडे प्रयाण केले. तिथून पुढे बडवानीला जायचे तर राजघाट टाळून परस्पर बडवानी गाठले, तर ५+५ असे १० किमी. कापण्यापेक्षा फक्त ५ किती प्रवास होईल व वेळ व अंतर वाचेल असा हिशेब होता.

काल माताजींनी याच विचारांच्या प्रकट ग्रुपला समजाविले, की ज्यासाठी तुम्ही घर सोडून आला आहात ते टाळून ते टाकून घाईने पुढे जाण्यात काय हशील आहे?

अशोकचे मनसुद्धा, हे तीर्थक्षेत्र पहावे, असेच होते. मातीच्या रस्त्याने निघालो आणि लक्षात आले की आश्रमातले तीनही भगवान म्हणजे कुत्रे आमच्या मागे मागे येत होते. उसाच्या मळ्याला उजवी घालून पुढे जाण्याऐवजी आत शिरलो आणि गडबडलो. उजवीकडे वळून काही वेळ चालला आणि पुन्हा मागे आलो आणि आधी कुणी सुचविल्यानुसार मळ्यावरुन डावीकडे वळून गाडी रस्ता धरला व पुढे निघालो. नदी पठार, घळी, चढते उतरते रस्ते आणि एकाऐवजी दोन रस्त्यांचे संमेलन पाहून अंदाजे रस्ते चालत, बदलत पुन्हा मागे पुढे चालत अखेर एका घरापाशी आलो. तेथपर्यंत तीनही कुत्रे आमच्या सोबत होते. तेथील माणसाने योग्य रस्ता सांगितला आणि तीनही कुत्रे तिथून माघारी गेले व आम्ही योग्य मार्गाला लागलो. ५ कि.मी. वर राजघाट आहे अंतर फार तर एक सव्वा तासाचे, परंतु तेव्हढा वेळ तर आम्ही नुसतेच फिरत होतो. आश्रमापासून एक दोन कि.मी. परिसरातच आम्ही घोटाळत होतो.

रस्ता मिळाल्यावरही अनेक अनेक ठिकाणी गाडी रस्त्याला गाडी रस्त्यांचे फाटे फुटत. काही कळत नसे परंतु ८।। वाजून गेले की धनगर, शेतकरी, मोटर सायकली यांपैकी कुणी न कुणी भेटायला लागते तर रस्ता विचारता येतो.

राजघाट गाठायला ३ तास लागेल. तिथे एका आश्रमात फार अगत्याने स्वागत झाले. काल रात्रीचा बाबा आमच्या मागून निघून आमच्या पुढे निघून गेला होता, तो या आश्रमात दिसला. त्यानेच आमच्या आगमनाची वार्ता दिल्याने दोन सेवेकरी आमची वाट पहात प्रवेशद्वाराशी

उभेच होते. दिलेला चहा घेऊन, आग्रहाला विनम्र नकार देऊन आम्ही राजघाट दत्तमंदिरात दर्शन घेतले.



मैय्या किनारी असलेले हे तीर्थस्थान प्रसिद्ध आहे. त्यामुळे परिसरात बरीच लहान लहान दुकाने थाटली गेली आहेत. एक स्थानिक हॉटेल होते. तिथे चहा पोहे घेतले, चणे घेतले व बडवानीकडे प्रयाण केले.

राजघाटापासून पुढील प्रवास सडकेने आहे. आम्ही प्रकाशापर्यंत बसने जाणार असा सर्वांचा समज दिसला. (बहुधा अनेक परिक्रमावासी असे करीत असावेत.) राष्ट्रीय महामार्गाने आम्ही बडवानी गाठले.

अकराच्या पुढील ऊन्ह सहन होत नाही. सकाळच्या माकडटोपीने नंतर उष्मा होतो. नुसत्या टोपीने घाम येऊन अस्वस्थता येते. डोक्याला रुमाल आणि वर माकड टोपी / कौंटी कॅप असा माझा पोशाख आता फक्त एका रुमालावर स्थिरावला आहे.

हवा खेळती राहिल्याने घाम येत नाही व थंडीमधले ऊन असल्याने डोके फार गरम होत नाही कालपासून मला सॅक, ऊन्ह सहन व्हायला लागले आहे.

मोज्यांना भोके पडल्याने मंगलने नवे मोजे घेतले. बडवानी शहरात 'नर्मदे हर' चा अधेमधे पुकारा झाला, खेड्याप्रमाणे गजर नव्हे!

बडवानी चौकातून बाबनगजा रस्त्याला लागलो आम्हांला पूर्वी भेटलेला एक गट मंदिराच्या अंगणात पाकसिद्धी करताना दिसला. त्यांतील स्त्रीला मंगलने ओळखल्याने सहज टेकलो आणि गोकुळ या परिवाराने भोजनाची विनंती केली व आम्ही नकार देऊ शकलो नाही. पुढील मुक्काम ७ किमी वर असल्याने वेळही होता. कारण फक्त एक वाजला होता. पोळी भाजी वरण व ताक असे सुग्रास व कमी तिखटाचे हवे तसे तयार भोजन प्राप्त झाले ही कृपा. भोजनासाठी विसावलेल्या परिक्रमावासींना गरजेप्रमाणे औषध देऊन अशोकने आनंद मिळवला.

एक वाजता भोजन, तेही तिखट नसलेले, वझे दांपत्याला आवडेल असे तयार मिळाले. ही मैय्याने केलेली योजना तर नव्हती? (वर प्रत्येकाला ११ रु. दक्षिणा मिळाली.)

दीड तास फुकट फिरल्याने कि.मी. हिशेब सरासरीला आला. असा वेळ गेल्याने इथे यायला उशीर झाला; एरव्ही आम्ही पुढे निघून गेलो असतो. बावनगंजला दुपारी पोहोचलो असतो, तरी मुक्काम करावाच लागला असता कारण पुढे भिल्लांची वस्ती आहे व १५ कि.मी. किमान चालल्यावर पाटी गाव आले असते. म्हणजे, ही सर्व योजना मैय्याची होती. जेवून निघालो. हे शूलपाणी जंगल आहे. ५ कि.मी.चा घाट रस्ता आहे.

संध्याकाळी वेळेवर जैन धर्मशाळेत पोहोचलो. रहायला जागा व तयार खिचडी मिळाली. सगळे कपडे साबणात भिजवून धुतले गेले.

क्रमशः

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

हीन भावनांना थारा देऊ नका. प्रसन्न राहण्याचा हर एक प्रयत्न करीत राहा. हे अजिबात अवघड नाही. तुम्ही कोणापेक्षाही कमी नाही, हे वारंवार स्वतःला बजावा.

# शोध भारताचा !

*हिंदुस्थान व इंडिया या नावांपेक्षा भारत हे नाव कसे सयुक्तिक आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न या लेखात केलेला आढळतो - संपादक*

तसा मोकळा वेळ होता. गाडी न घेताच बाहेर पडलो थोडा बसने थोडा चालत. संध्याकाळची वेळ. रस्त्यावर खूपच रहदारी. मुख्य चौकात रस्ता क्रॉस करण्यासाठी थांबलो. लांबून अम्बुलन्सचा सायरन पापु***पापू**** कानावर पडला. सतत व्यस्त त्रस्त आणि बधिर थंडगार वाहनात बसलेत्या कानांनवर मात्र त्याचा काहीच परिणाम नाही. कशीबशी वाट काढत अम्बुलन्स आणि मी चौक ओलांडला.

समोरच्या पुस्तकाच्या दुकानात शिरलो, नजर पडली ती, इंग्रजी बालभारतीवर. सहज चाळलं तर पहिल्याच पानावर The constitution of India Preamble, We, The People of India, शेजारीच मराठी बालभारती, भारताचे संविधान! प्रतिज्ञा! भारत माझा देश आहे! सारे भारतीय माझे बांधव आहेत.

प्रश्न पडला इंडिया की भारत? दोन्ही पुस्तके घेतली पैसे दिले, नोटेवर सहज पाहिलं तर भारतीय रिझर्व बँक, खाली Reserve Bank of India मग पोस्टाचे स्टम्प विकत घेतले. भारतीय डाक India Post आणि Non Judicial स्टम्प वर भारतीय गैर न्यायिक, India Non Judicial.

रस्त्यावर लाल दिव्याची सरकारी गाडी, भारत सरकार, खाली Govt. of India .

भारतीय वायुसेना Indian Air Force, भारतीय सेना Indian Army, भारतीय नौसेना Indian Navy. भारतीय रेल Indian Railway. सगळीकडे तेच इंडिया आणि भारत.

काही जणांशी बोललो, अगदी ठरवून जवळच्या मित्रांकडे, विषय काढला. म्हणाला, मी Indian ! का? भारतीय का नाहीस? तस ठोस उत्तर नव्हतेच. इंडियन ही LifeStyle! जीवनपद्धत! भारतीय एक विचाधारा! विचारप्रणाली! शेवटी मीच ठरवलं. काय फरक पडतो! इंडिया काय भारत काय! शेवटी आपला देशच! हे काही जणांच उत्तर.

विश्वामित्र ऋषींची मेनका या अप्सरेपासून झालेली कन्या शकुंतला. तिचा विवाह पुरुवंशीय राजा दुष्यंताशी झाला. त्यांचा पुत्र म्हणजेच पराक्रमी भरत. यावरून देशाला भारत हे नाव पडले असा एक मतप्रवाह आहे. हा मतप्रवाह सर्व देशात मान्य केला जातो.

आपल्या देशाला हिंदुस्थान या नावाने काही राज्यांत संबोधल जात, सिंधू नदीच्या पश्चिमेला असलेल्या वसाहतीत राहणारे ते हिंदू, म्हणून हिंदुस्थान अस म्हणता येईल, परंतु त्यात कोणत्याही जाती धर्माचा उल्लेख सापडत नाही.

युरोपीय देशांनी व्यापाराचे निमित्त करून भारतात वसाहती स्थापन केल्या, त्यात फ्रेंच - डच - पोर्तुगाल आणि इंग्रज व्यापाऱ्यांचा समावेश होता.बहुधा त्यांनीच हिंदू याचा इंग्रजी मध्ये indu- indus- indica म्हणून India ! असे नामकरण केले असावे. आता इथे कुठला भाषिक विरोध नक्कीच नाही. इंग्रजी ही भाषा काही देशात आणि भारतात लिहिली बोलली जातेय आणि तीचा प्रसार आणि वापर वाढतच जातोय, त्या बद्दल फार प्रेम नाही

---

जर रस्ता सुंदर असेल, तर तो कुठे जातो हे विचारू नका. जर मुक्कामाचे ठिकाण सुंदर असेल, तर रस्ता कसा आहे हे विचारू नका. चालण्याचा आनंद घ्या आणि जीवनाचाही!

तसा राग आणि द्वेषही नाही. भाषेच स्वातंत्र्य भारतात आहे.

जगातल्या कुठल्या देशाचं नाव हे असे मायभाषेत एक इंग्रजीत दुसरं असे कुठे न ऐकण्यात आलं, ना वाचनात आलं.

दि.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी देशाची नवी राज्यघटना अंमलात आल्यानंतर देशाचे नाव अधिकृतपणे भारत अर्थात इंडिया असे झाले.

आता हे लिहिण्याच कारण, हा एक विचार आहे! (given a thought) थोडासा निवांतपणे विचार करा! काही फरक पडू शकेल, भारतीय म्हटल्यामुळे?

वर लिहिल्याप्रमाणे इंडियन ही Lifestyle! जीवनपद्धत! असं एकवेळ खरं मानल तर भारतीय म्हटल्या मुळे आपल्या रोजच्या दैनंदिन जगण्यात – राहणीमानात असा कोणता बदल होणार आहे? बरे त्यासाठी काही कुठे मोर्चा काढायचा नाही की उपाशी राहून कुठलं आंदोलन करायचं नाहीये. लाठ्या काठ्या घेऊन तोडफोड तर नाहीच, रास्तारोको तर अजिबातच नाही. बदल करायचा आहे तो, आपल्या विचारांमध्ये! बघा! पुन्हा थोडा जास्त विचार करा! काही फरक पडतोय भारतीय म्हटल्या मुळे?

कोणाचं तरी घोष वाक्य आहे विचार बदला! देश बदलेल! आपण ह्या देशाचं नाव बदलू या. बोला भारत! लिहा भारत! बोलो भारत! लिखो भारत! speak भारत! wright भारत!

त्रिवेंद्रमचे तिरुअनंतपुरम् झाले, बॉम्बेची मुंबई झाली आणि बंगलोरचे झालेय बंगळूरू !सिलोन आणि ब्रम्हदेश यांनी यथावकाश आपली नावे बदलून अनुक्रमे श्रीलंका व म्यानमार केली. फार लांब नाही अगदी ठाणा चे ठाणे! पुना चे पुणे! या साठी आपणच आग्रही राहिलो आणि हा बदल करून घेतला, मग कशाला हवा इंडिया आणि हिंदुस्थान.

हिंदू – बौद्ध – जैन – ज्यू – ख्रिस्ती – इस्लाम – शीख – पारशी अशा विविध धर्मांचे नागरिक ज्या देशात गुण्यागोविंदाने राहतात तो हिंदुस्थान कसा ?

विविध भाषिक, अनेक जाती धर्माचे – पंथाचे रितीरिवाज सणा सारखे साजरे करताना शेजारच्या इतर धर्माच्या नागरिकांचा उस्फूर्त सहभाग आणि या विविधतेत एकता हे भारत देशाचे वैशिष्ट्य आहे. जे इतर कुठल्या ही देशात अगदी अभावानेच आढळते.

मग आपणच इंडिया, ज्याला काही इतिहास नाही त्या नावाचा का आग्रह धरतो ? भारत! म्हणून घेण्यात काय कुठला कमी पणा आहे?

Quit इंडिया बोला भारत! लिहा भारत! बोलो भारत! लिखो भारत! speak भारत! wright भारत!

हा भारताचा शोध इथेच थांबत नाही. अजून खूप आत... आत आत.जायचंय, विस्मृतीत गेलेला भारताचा इतिहास नव्याने उलगडून पहायचाय, पुन्हा तो तुमच्यासमोर वेगळ्या स्वरूपात मांडायला हवा. तेव्हा कुठे उमजेल हा बलशाली भारत!

ह्या संदर्भात आपल्या काही सूचना, प्रतिक्रिया, अधिक अशी माहिती – सहभाग, आपणा कडून अपेक्षित आहे.

कुठलीही टीका करण्यचा आपला हक्क अबाधितच आहे. त्यातूनच हा विचार अधिक प्रगल्भ होईल आणि अधिकाधिक भारतीय नागरिकांपर्यंत पोचवता येईल.

**श्री. अनंत गोखले**

भ्रमणध्वनी ९८५०७२६२११

●●●

सवय ही कारणापेक्षा प्रबळ असते. यशस्वी होण्याची सवय लावून घ्या.

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना

*श्री. साने यांच्या विचार परिपूर्ण लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

कलियुगाचा अंतकाळ हे दर्शवितो की आता जीवात्म्यांची स्थिती ही ''आत्मज्ञान'' जागृती व जीवात्म्याची परमात्म्याची भेट होण्याची वेळ आहे. अनुकूल आहे व आशय गर्भित आहे. मानवी ज्ञानाची ही ''जगन्नाथ यात्रा'' म्हणजे "Human consciousness" ची काळातील Evolutionary Movement युगानुयुगे चालणारी प्रयासयात्रा ह्या 'मुहूर्त घटकेपर्यंत' आली आहे.!

माझ्या या लेखाचा हेतू ह्या जाणिवेने भारित व प्रभावित झाला आहे असे वाटते!!

त्यामुळे, मानवी शरीर (श्रीयंत्र) ज्ञानाच्या मागे असणारा प्रकाश झोत (त्राटक योग) व तो आता 'आत्मज्ञान', 'आत्मबोध' व 'आत्मा-परमात्मा' (जीवा-शिवाची भेट) यांच्या मीलनासाठी उपयुक्त व्हावयाला हवा!! अनार्थांचे 'आर्यीकरण गतिमान व्हावयाला हवे!! मानवी जीवन हे आता ह्या 'हनुमान उडीसाठी ' प्रवृत्त व्हावयाला हवे!! हनुमान स्तोत्रातील, ''झेपावे उत्तरेकडे'' ही समर्थांची दिशा ही एक योगसाधनेची 'दिशा दाखवते आहे!!' योगाच्या भाषेत (परिभाषा) ही साधना 'मूलाधारचक्र' ते 'सहारआर चक्र', प्राण विद्या व 'ब्रह्मरंध्र' ह्या प्रवासाची दीक्षा सुचवते आहे, असे मला मनोमन वाटते.

## प्रास्तविक

गेली काही वर्षे मी ''भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना'' ह्या शीर्षकाखाली जवळ जवळ दरमहिना एक लेख 'दिशा' मासिकातून प्रसिद्धीसाठी पाठवत आलो आहे. पण, मला असे जाणवले आहे की या लेखांचा रोख 'आत्मज्ञान' या अतिशय जड संकल्पनेशी जोडला गेला आहे. त्याचे कारणही उघड आहे. कारण मानवी अस्तित्वाचे खरे वर्णन हे ''नाशिवंत शरीर व चिरंतन आत्मा'' यांच्या संयोग धारणेवर आधारलेले आहे. हे सत्य अत्यंत खोलवर संशोधन करुन योग साधना भारताच्या ऋषी मुनींनी सर्वसामान्य मानवजातीला उपलब्ध करुन दिले आहे. एवढेच नव्हे, तर त्याच्या सत्य दर्शनासाठी ज्या पूरक वा जोड साधना प्रत्यक्ष 'अनुभूती दर्शन' देऊ शकतील त्या पुरस्कृत केल्या आहेत. त्या साधना त्या नाशिवंत 'शरीर यंत्रामार्फत' आत्म्याला हव्या असणाऱ्या 'भाषेत' संक्रमित करण्याचे मार्ग सांगितले आहेत. या यंत्रणा, योग, तंत्र, मंत्र, आयुर्वेद, संगीत वगैरे शारआंच्या मार्फत विकसित केल्या आहेत. पण, या यंत्रणा, उपचार, युक्त्या ज्या संस्थांच्या मार्फत युगानेयुगे भारतीय संस्कृतीच्या जिवंत अस्तित्वाने नवीन जन्माला येणाऱ्या मानवी समाजाला उपलब्ध होत होत्या, त्या आज भीषण धोक्यात सापडल्या आहेत व जवळ जवळ नाहीशा व अशक्त वा विकृत होत चालल्या आहेत! हा भयंकर धोका भारताबाहेरील जगाने या मानवी ज्ञानावर नकळत ओढवून आणलेला आहे.

## कलियुग, जन्मसिद्ध संस्कारास अडचण

याचे उघड कारण असे आहे की सध्यातरी 'कलियुग' चालू आहे व त्यामुळे पृथ्वीवर वा भारत भूमीवरसुद्धा जन्माला येणाऱ्या मानवाला या विलक्षण प्रभावी आत्मज्ञानाला पूरक असा 'जन्मसिद्ध' संस्कार प्राप्त होण्यात अडचणी आल्या आहेत.

गप्प बसणे इष्ट असताना बोलू नये. बोलणे इष्ट असताना गप्प बसू नये.

आरोग्याच्या प्रांतात जसे Genetic म्हणजे 'वंशपरत्वे चांगले व वाईट संस्कार' प्राप्त होतात व तसे दैवी गुण संपदा आरोग्य किंवा उलटही आसूरी संपदा व रोग प्राप्त होतात, ती देणगी 'जन्म, मृत्यू व पूनर्जन्म' ह्या वैश्विक चक्र योजनेत दोषयुक्त बनली आहे.

**भौतिक राजकीय, सामाजिक, आर्थिक सत्ता – असहिष्णुता**

ह्या गंभीर विषयाकडे मानवी समाजातील राजकीय, सामाजिक वा आर्थिक सत्ता पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहेत. त्याचे मोठे कारण हे आहे की जन्माने प्राप्त होणाऱ्या शरीर व इंद्रियांची रचना ही शरीरी बहीर्गत सृष्टीकडे 'पूर्ण सत्य' ह्या भूमिकेतून पहात असते. ह्या दृष्टीला देहांतर्गत असलेल्या पराविद्यांवर व ब्रह्मशक्ती वा प्राणशक्तीच्या मार्फत योगशारआने अनुकूल होणाऱ्या अतरंग साधनेला आवाहन करवून अंतर्ज्ञानी करावे लागते. **त्या ''विद्या'' आज पूर्णपणे धोक्यात आहेत.**

इतर जगाला ह्या विलक्षण भारतीय (विशेष व आगम) ज्ञानाबद्दल पूर्ण शास्त्रीय ज्ञान नाही. अपवादात्मक काही त्रोटक उदाहरणे आहेत, पण संपूर्ण ज्ञानाच्या अभावी ह्या ज्ञानाची ही उपकरणे जाणिवपूर्वक वापरली जाणे अशक्य आहे. भारतासारख्या ह्या ज्ञानाच्या जन्मस्थलाची जी दैना आहे तिच्या तुलनेने इतर राष्ट्रांकडे काही आशेने पहाणे अशक्य आहे!!

माझ्या लेखाची ही पूर्वभूमीका आणखी विस्ताराने सांगावयाला हवी हे मला जाणवते आहे, पण क्रमशः हे कर्तव्य बजावण्याचा मी प्रयत्न करीनच असे आज मानतो आहे.

ह्या क्षणाला मला असे वाटते की छोट्या छोटया उदाहरणाने ह्या 'गंभीर व गूढ' वैश्विक ज्ञानाच्या जाणिवेकरता वा पुनर्जीवन व पुनस्मृंतीकरितां जर मानवी समाजाचे विशेषतः भारतीय समाजाचे लक्ष वेधले गेले, तर काही 'स्फुल्लिंग धर्तीचे' काम होऊ शकेल. तसे ते करण्यासाठी थोडेसे त्रोटकपणे पण मूळ उद्देशाला पूरक असे प्रासांगिक लेख लिहिण्याचे मी योजतो आहे.

**उरु ज्योतिः व ऋग्वेदाची 'आर्य' व्याख्या**

हे विचार लिहिल्यावर काही आठवड्या नंतर माझ्या हाती, मी १९९८ साली 'भारतीय विद्या भवनाच्या पुस्तकालयात, अगदी योगायोगाने, मी एक पुस्तक खरेदी केले, ते हाती पडले. त्याचा उपयोग ह्या दिव्य कामाला होईल असे मला आज वाटते आहे.

हे पुस्तक 'रद्दीसाठी' वेगळ्या 'शेल्फ' वर ठेवलेले होते व माझ्या पुस्तक धुंडाळण्याचा गडबडीत मागल्या बाजूला खाली पडले त्या पुस्तकाचे नाव असे आहे ''उरु ज्योतिः'' वैदिक अध्यात्मसुधा'' लेखक : श्री. वासुदेवशरण अग्रवाल (काशी विश्व विद्यालय ६.१०.५३)

हे पुस्तक विलक्षण आहेच, पण त्याला (ज्ञानाला) प्रकाशात आणण्याचे श्रेष्ठ पुण्य श्रेय ''ब्रह्मदत्त जिज्ञासू (निवेदक) प्रधान श्री. रामलाल कपूर ट्रस्ट, गुरु बाजार, अमृतसर या संस्थेला द्यावयाला हवे.

**मुळातच 'उरु ज्योति' म्हणजे काय?**

**ऋग्वेदात एक ऋचा आहे. (१/११७/२१) '' उरु ज्योतिश्चक्रयुगर्याय.''** डॉ. चित्रावशास्त्री लिहितात **'आर्यांना दिसलेला प्रकाश'** असा याचा साधा अर्थ!! ह्या दिव्य अर्थाचे 'प्रकाश श्रेय' 'अश्विनीकुमार' यांच्याकडे जाते. अर्थात ह्या सर्व २५ ऋचा **''अश्विनी कुमार''** यांच्या **'प्रशस्तिसूक्तातून'** वाचल्या पाहिजेत.

पण, ह्या ऋचेचे भाषांतर असे – '' २१. नांगराच्या साह्याने धान्य पेरून मनुष्यांसाठी अन्नोत्पादन करणाऱ्या हे अश्विनी कुमारांनो, आपल्या वज्राने 'दस्यूंचा' वध करुन 'आर्य' लोकांसाठी तुम्ही विस्तृत प्रकाशमान भूमी उपलब्ध करून दिलीत.

मेल्यावर स्वर्गात जाण्याची चिंता करण्यापेक्षा जिवंतपणी आपल्या सभोवती स्वर्ग निर्माण करा.

पुढे डॉ. चित्रावमारद्यी म्हणतात, **''आर्यसमाजी लोकांमध्ये या शब्दाचे महात्म्य विशेष मानतात.''** या वाक्याने कदाचित एक संकुचित दृष्टिकोन प्राप्त होऊ शकतो कारण, **'आर्य' कोण?** हा प्रश्न आज विचारणे वा जाणणे अत्यंत आवश्यक आहे.

**आर्य, स्वामी दयानंद व अरविंद योगी**

कारण १) 'आर्य' २) भारतीय ३) हिंदू या प्रकारच्या सूक्ष्म भेदभावाने ह्या 'आर्य' संकल्पनेचा मूल 'दैवी मानव भाव' नाहीसा झाला आहे. आपण अध्यात्मशास्त्रातून भौतिक 'धर्म', म्हणजे ह्या भौतिकवादी संकल्पनेत घसरलो आहोत. ह्यावर 'प्रकाशीय वक्तव्य' मध्ये पुस्तकाचे प्रकाशकच उत्कृष्ट प्रकाश झोत टाकतात!



त्यांच्या मूळ हिंदी वाक्यांचे सरळ भाषांतरच इथे मांडतो.

खुद्द 'वेदांना' ईश्वराने केलेला **'ज्ञानमय तप'** ह्याचे फलित, असे स्वरूप मानले जाते. 'निखील सृष्टी' चे जे ज्ञान आणि विज्ञान आहे, त्याला 'सत्य रूप' (Reality) मानले जाते. त्या सत्याचे 'बहुमुखी' स्वरूप व व्याख्या **हा वेदांचा उद्देश आहे.**


पुढचे वाक्य महत्त्वाचे आहे. ते मूळ हिंदीमध्ये लिहितो. ''सृष्टि विद्या की पूर्णतम भाषा वैदिक परिभाषा के रुप मे प्रकट हुई है। ऋषियों की समाधि वह अध्यात्मिक प्रयत्न था, जिस के द्वारा ज्ञान विज्ञान के महान सत्यका साक्षात्कार किया जाता है। समाधि की अवस्था मे जिन नित्य जनों और अर्थों की 'सत्यात्मक ज्योति' का **'प्रत्यज्ञ'** होता है उसी सहरआत्मक विशालज्ञान ज्योति कोटी वैदिक भाषा मे **उरु-ज्योति** कहा गया।

यह प्रकाश पृथ्वी, अन्तरिक्ष और द्युलोक के गंभीर अंतराल में भरा हुआ है। लोक लोकान्तरो में भी यही प्रकाश व्याप्त है।

कल्प के आदि प्रलयान्त तक यह प्रकाश या ज्योति कभी अंधकार से 'धूमिल' नही होता. यही ईश्वर का देश और काल में अबाधित सत्यात्मक रूप है। इसी के लिए कहा गया है **''इस ज्योतिश्चक्रधुरार्याय''**।

हे प्रकाशिय भाष्य एवढे महत्त्वाचे आहे की आजच्या तथाकथित 'विज्ञानाच्या मार्गाने म्हणजे भौतिक शारआंच्या पद्धतीने अफाट प्रयत्न करूनही ह्या जगातील मानव सृष्टीला ज्या 'सत्य व ऋत' वैश्विक गूढ 'Reality' चा शोध लागला जात नाही, त्या जगाला, **'उरू ज्योति'च्या मानवी समाजाला 'आर्य' बनवण्याच्या,** 'वैदिक ज्ञानाचा', बिलकूल परिचय-आजही-नाही!!

या प्रयत्नांची अलिकडच्या काळांत जी थोडीबहुत जाणीव निर्माण होऊ लागल्याची लक्षणे दिसू लागली त्या प्रयत्नांचे खरे श्रेय बहुतांशी स्वामी दयानंद (आर्य समाज संस्थापक व पाँडिचरी स्थित महायोगी अरविंद व मदर यांना द्यावे लागेल.



### अपौरुषेय वेद ज्ञान

त्यामुळे 'हे ज्ञान' अपौरुषेय वा ईश्वरी आहे असे का म्हटले जाते, याचे अर्थ समजतील. हे ज्ञान **'समाधिजन्य'** आहे ते कां? हे सुद्धा मानवी भौतिक स्तरावरील जीवांना त्यांच्या 'मर्यादित चैतन्य प्रभावाखालील बुद्धीच्या मर्यादीत बंदिस्त आहे. त्याचे हेच कारण आहे हे सुद्धा समजले!!

म्हणूनच, महायोगी अरविंद यांच्या **'Secrets in Vedas'** (वेदरहस्य) ह्या पुतकाचे महत्त्व समजेल. त्या अगोदरच्या काळांत वेदांचे अर्थ चुकीच्या पद्धतीत लावले गेले हेही समजेल.

मग हे ज्ञान सरळपणे मानवी जीवांना आतातरी का उपलब्ध होत नाही? मानवी भाषा 'Languages' कमी वा तोकड्या पडतात का? सत्यज्ञान प्राप्त होणे हा एक 'लढा' आहे.



याचे कारणही त्यामुळेच प्रकाशक व लेखक श्री. अग्रवाल देतात. ह्या ज्ञानाच्या 'सत्य व ऋत' अर्थाच्या प्रकाशाला 'मित्र व वरुण' ह्यांच्या द्वंद्वात्मक कार्याचा संदर्भ आहे. इसी को ऋत व सत्य भी कहा जाता है। स्वयं सृष्टि का महान देव इस द्वंद्व से अजीज है। यह स्वयं सत्यात्मक ज्योति है।

### जीवात्माचे आर्थीकरण

**आर्यजन को उसीका दर्शन करने का प्रयत्न करना उचित है।**

मग हे ज्ञान एकदा एका पिढीला प्राप्त झाल्यावर कायम व सतत ह्या पृथ्वीवरील समाजाला का प्राप्त होत नाही? हा प्रश्न महत्त्वाचा आहे नक्कीच!! त्याचे उत्तर आहे, की प्रत्येक नवीन पिढीतील जन्मणाऱ्या जीवांना ''भौतिक स्तरावरील काँशसनेस'' प्राप्त होतो. तो 'संकुचित' असतो.

**त्या 'भौतिक भारतीय, हिंदू किंवा इतरही धर्मातील जीवांनाही ''आर्य'' बनवणे हे ह्या 'उरूज्योति'च्या प्रकाशाचे काम आहे.**

हे काम सध्याची भौतिकवादी किंवा भासात्मक खोटी वा 'अपूर्व अध्यात्मवादी जग यंत्रणा' हे काम करू शकत नाही.

त्या करिता हे **'अनार्याचे आर्यीकरण'** सतत चालू ठेवावयाला हवे. त्याकरिता ह्या क्रियेला पूरक असणाऱ्या संस्थांमार्फत योगक्रिया सातत्याने करावयाला हव्यात.

### भारत राष्ट्र व आर्थीकरण

म्हणूनच, ''भारत'' म्हणजे 'भा' – दिव्य प्रकाश 'रत' म्हणजे ह्या कामात सदैव मग्न असणारा हा भारतदेश वा भारतभूमी!! अशा कार्यक्रमाला उपयुक्त अशी 'संस्कृती व संस्था' जतन व कार्यरत ठेवण्याच्या प्रयत्नात युगेयुगे धडपडत आहेत!! ही विशेष जाणीव होणे हे सध्याच्या Social Political Economical Societies ह्यांना आवश्यक आहे. पण ज्या पूर्वग्रहाने व अहंमन्यतेने

हाव आणि हव्यास या क्रमाने मानसिकता बदलत गेली की मनःशांती तर दूरच,
पण साध्या समाधानालाही माणूस मुकतो.

या जगातले 'भौतिकवादी 'एकांगी अज्ञानी' विद्वान आपल्या ज्ञानाची दिशा, दृष्टी' समाजावर लादत आहेत, तेथे हा समन्वयी 'लढा' अध्यात्मवादी व योगी भारतीयांना किंवा आर्यसमाजाला सतत चालू ठेवणे आवश्यक आहे.

**Integral Conversion of Soul**

त्यासाठी त्यांना सामाजिक, आर्थिक व राजकीय पातळीवरच्या राजसत्तेला व भौतिक यंत्रणेला सामंजस्याने तोंड द्यावे लागेल. हा एक अपरिहार्य वैश्विक प्रयत्न भारतामधील जनतेला करणे हे इश्वरी कर्तव्य आहे असे म्हणावेसे वाटते!!

हा लेख अगदी प्राथमिक अवस्थेतील नवीन प्रयत्न आहे. ह्या प्रयत्नांचा विस्तार व खोली व पातळी वाढवण्यासाठी अनेक लेख लिहावे लागतील. त्याला ईश्वरी आशीर्वादाची गरज आहे!!

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr1@gmail.com

•••

## चिंतन

संस्था कोणतीही असो,
सरकारी, सहकारी,
खाजगी वा धर्मार्थ,
संस्थेत ठरावीक काम करणे,
हा झाला कायदा.
पण कामात स्वत:ला झोकून देणे,
ही झाली नैतिकता.
मी पगार घेतो, म्हणून काम करतो,
हा झाला व्यवहार.
संस्थेच्या अस्तित्वाची,
सुरक्षिततेची, प्रतिष्ठेची
योग्य काळजी घेण्याचे कार्य
मला पार पाडावयाचे आहे,
ही झाली आपुलकी.
संस्थेची प्रगती आहे,
तोवर माझे अस्तित्व कायम आहे.
माझी प्रतिष्ठा आहे म्हणून संस्थेला
हानिकारक ठरेल,
अशी कृती मी कधीही करणार नाही.
पण सामाजिक ऋण
फेडण्याच्या भावनेने,
स्वत:ला कामात वाहून घेईन.
ही प्रत्येकाची भावना असली पाहिजे,
यातच देशाचा विकास व
स्वत:चा उद्धार आहे.

*दिशा संपर्क दूरध्वनी*
*०२२-२५४२ ६२७०*

आपल्या माणसांकडून मोठमोठ्या अपेक्षा करणे सोडून द्या, नाहीतर तुमचा अपेक्षाभंग होईल व तुम्ही दु:खी व उदास व्हाल.

# परिसर वार्ता

– संकलित

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**IPM २०१३ (मेगा फायनल) गणित परीक्षेचा निकाल:**

यशस्वी विद्यार्थ्यांची यादी :

| इयत्ता | नाव | क्रमांक |
|---|---|---|
| इ. ५ वी | कु. सरगुनदीपकौर सचदेव | २११ |
| इ. ७ वी | कु. ओंकार वरुडकर | ६३ |
| इ. ७ वी | कु. मिहीर देसाई | ६९ |
| इ. ७ वी | कु. श्रीदिप क्षीरसागर | १७१ |
| इ. ७ वी | कु. शांभवी जोशी | १७७ |
| इ. ९ वी | कु. तक्ष सत्रा | ३४ |

**महर्षी व्यास विद्या प्रतिष्ठान आयोजित अमरकोश पाठांतर स्पर्धेचा निकाल :**

कु. इशांत मलिये – प्रथम क्रमांक

**ब्राह्मण सेवा संघ आयोजित मराठी वक्तृत्व स्पर्धेचा निकाल :**

कु. शांभवी जोशी – प्रथम क्रमांक

कु. ईशिता सुळे – द्वितीय क्रमांक

कु. रुचिरा जोशी – उत्तेजनार्थ

**ब्राह्मण सेवा संघ आयोजित 'समूह श्रीमद्‌भगवद्‌गीत पठण' स्पर्धेचा निकाल :**

कु. अनु अहिरे, कु. जान्हवी नातू, कु. मैत्री मोभारकर, कु. सेजल राजवडे व कु. इशांत मलिये यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

**All India Institute of Mathematics Education आयोजित गणित मंजुषा स्पर्धेचा निकाल :**

कु. शांभवी जोशी व कु. शुभम पट्टेकर यांना द्वितीय पारितोषिक मिळाले.

कु. वेदांत केळकर याने Junior Maths Olympiad Contest मध्ये कप्रेकर शिष्यवृत्ती प्राप्त करुन रजत पदक व प्रशस्तिपत्रक पटकावले.

**क्रीडा :**

- हॉली क्रॉस कॉन्व्हेंट हायस्कूलमध्ये आयोजित झालेल्या १२ वर्षांखालील मुली. मॅरेथॉन स्पर्धेत वैष्णवी घाग हिने ४ था क्रमांक पटकावला.
- देवश्री खोपकर हिने इगल आय मार्शल ॲण्ड स्पोर्टस् असोसिएशन आयोजित कराटेच्या काटा आणि कुमिटे स्पर्धेत सुवर्ण पदके पटकावली.
- वयम आंतरशालेय बॅडमिंटन स्पर्धेत, १४ वर्षीय खालील मुलींच्या वयोगटात वैष्णवी घाग हिने कांस्य पदक तसेच १७ वर्षीय खालील वयोगटात शलाका सहस्त्रबुद्धे हिने सुवर्ण पदक पटकावले.

**संस्कृती कला दर्पण संस्थेतर्फे आयोजित केलेल्या इंग्रजी वकृत्व स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले :**

| स्पर्धेचे नाव | इयत्ता | विजेत्यांचे नाव | क्रमांक |
|---|---|---|---|
| वक्तृत्व | इंग्रजी (VII & VIII) | मैत्रेयी भारती<br>जान्हवी साने | द्वितीय<br>उत्तेजनार्थ |
| | इंग्रजी (IX & X) | गायत्री पाटील<br>शलाका सोंजे | प्रथम<br>द्वितीय |

जीवनाच्या प्रवासात उजेड–अंधार, सुख–दुःख येत–जात राहतात. दुःखाला व अंधाराला घाबरण्याऐवजी आकांक्षा अत्युच्च ठेवून दिवा पेटवून प्रकाश करा.

| | | | |
|---|---|---|---|
| | मराठी (VII & VIII) | शांभवी जोशी | प्रथम |
| | | श्रुती कुलकर्णी | उत्तेजनार्थ |
| | मराठी(IX & X) | सायली तवटे | प्रथम |
| एकपात्री | (VII & VIII) | मैत्रेय भारती | द्वितीय |
| | | मयांक पाटणकर | उत्तेजनार्थ |
| | | मृगांक पाटणकर | –''– |
| | | विभव रानडे | –''– |
| | | साक्षी भट | –''– |
| | | रिया गुजरे | –''– |
| | | सिद्धी कानिटकर | –''– |
| गायन | (V & VI) | वरद काणे | प्रथम |
| | (IX) | रजवी पोलाडिया | प्रथम |
| | | श्रावणी राणे | उत्तेजनार्थ |
| भेट कार्ड | (V & VI) | शुभम करमपुरे | द्वितीय |
| | | आशिष रावल | उत्तेजनार्थ |
| | | जिनय गाला | –''– |
| | | जान्हिवी नातू | –''– |
| | | अनू अहिरे | –''– |
| | | स्नेहा घाटे | –''– |
| | | केतकी धर्माधिकारी | –''– |
| | | सगुनदीपकौर सचदेव | –''– |
| | | मृण्मयी कानेटकर | –''– |
| | (VII & VIII) | संयुक्ता मुळे | द्वितीय |
| | | पुष्टी मेहता | उत्तेजनार्थ |
| | | श्रुती कुलकर्णी | –''– |
| | | शांभवी जोशी | –''– |
| | | संजना परांजपे | –''– |
| | | रसिका गोडबोले | –''– |
| | (IX & X) | ओंकार सुर्वे | उत्तेजनार्थ |
| | | केतकी तावडे | –''– |
| | | वरदा सहस्त्रबुद्धे | –''– |

| | | | |
|---|---|---|---|
| निबंध | मराठी(V & VI) | यश चाबुकस्वार | उत्तेजनार्थ |
| | मराठी(IX & X) | अमला पटवर्धन | द्वितीय |
| | | रसिका गोडबोल | उत्तेजनार्थ |
| | | श्रेयस केळकर | –''– |
| | | सिद्धी झाम्ब्रे | –''– |
| | | रुचिरा राठोड | –''– |
| | | वैष्णव देसाई | –''– |
| | | निकिता वेलंगी | –''– |
| | | शलाका सोंजे | –''– |
| | इंग्रजी (V & VI) | सगुनदीपकौर सचदेव | प्रथम |
| | | सिद्धी कानिटकर | उत्तेजनार्थ |
| | इंग्रजी ( VIII & IX) | गायत्री पाटील | उत्तेजनार्थ |
| | | आदिती गोरे | –''– |
| चित्रकला | (V & VI) | सगुनदीपकौर सचदेव | प्रथम |
| | | तिशा बौवा | उत्तेजनार्थ |
| | | शुभम करमपूरे | उत्तेजनार्थ |
| | | परिणिता कुलकर्णी | –''– |
| | | देवांश गाला | –''– |
| | | आदित्य घोष | –''– |
| | | अनिष लवाटे | –''– |
| | | स्नेह पाध्ये | –''– |
| | (VII & VIII) | रिया बर्वे | द्वितीय |
| | | अर्चित जोगळेकर | उत्तेजनार्थ |
| | | आदित्य भावे | –''– |
| | | श्रृष्टी पोळेकर | –''– |
| | | आकांक्षा राडे | –''– |
| | (IX & X) | साक्षी वैद्य | उत्तेजनार्थ |
| | | रुचिरा राठोड | –''– |
| | | ईशा गांगल | –''– |
| | | सानिक कुलकर्णी | –''– |

एकत्र येणे ही सुरुवात असते. एकत्र रहाणे ही प्रगती असते आणि एकत्र काम करणे, हे यश असते.

## बांदोडकर विज्ञान विद्यालय

### कलाकार तुमच्या भेटीला

सांस्कृतिक मंडळातर्फे ६ डिसेंबर रोजी कलाकार तुमच्या भेटीला हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी दूरदर्शन वाहिनीवर काम करणारे श्री. विघ्नेश जोशी, निर्माता व दिग्दर्शक मोहन पाठक, संगीतकार सोहम पाठक, सिनेकलाकार राजू पटवर्धन व अभिनेत्री सौ.पूर्णिमा अहिरे आदी कलाकारांना आमंत्रित करण्यात आले होते.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. र. प्र. आठल्ये कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्य श्री. एच. बी. काटकर पर्यवेक्षिका सौ. पुष्पा कृष्णन आणि सांस्कृतिक मंडळाचे संयोजक श्री. प्रकाश माळी यांच्या उपस्थितीत दीप प्रज्ज्वलनाचा कार्यक्रम पार पडला.

श्री. विघ्नेश जोशी यांनी यावेळी तरुण मुलामुलींवर एक कविता सादर केली. यशाची मजा ही हळुवारपणे, चाखायची असते. कोणत्याही क्षेत्रात तुम्ही आज पाऊल टाकलं की लगेच दुसऱ्या दिवशी तुम्हांला यश मिळत नाही, तर त्याकरता अथक परिश्रम, सातत्य, चिकाटी या सर्व गोष्टींची आवश्यकता असते, असा संदेश उपस्थित कलाकारांनी विद्यार्थ्यांना दिला.

या कार्यक्रमाला २०० विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर सहकारी उपस्थित होते.

### अक्षरलेखन कार्यशाळा

सांस्कृतिक मंडळातर्फे ७ डिसेंबर रोजी दुपारी २.३० ते ४.३० यावेळात अक्षरलेखन कार्यशाळा या विषयावर एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी श्री. राम कस्तुरे, उद्योजक वेदाक्षरे कला दालन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी ते म्हणाले की,अक्षर सुवाच्च असणे ही एक अतिशय महत्त्वाची बाब आहे. त्यानी इंग्रजी, हिंदी व मराठी भाषेतील मुळाक्षरे विविध पद्धतीने लिहून त्यांचे सादरीकरण केले.

या कार्यक्रमाला ८० विद्यार्थी व १५ शिक्षक उपस्थित होते.

### हिप हॉप व साल्सा कार्यशाळा

सांस्कृतिक मंडळातर्फे हिप हॉप व साल्सा या नृत्यप्रकारांवर एक कार्यशाळा १४ डिसेंबर रोजी दुपारी २.०० ते ५.०० या वेळेत पतंजली सभागृहात आयोजित करण्यात आली होती.

ही कार्यशाळा श्री. राजदीप पिलवान, एम.डी. डान्स विल्ला, कु. प्रियांका निंबकर, अभिजित पोळ व सोफिया कोळी यांच्यातर्फे घेण्यात आली.

हिपहॉप व साल्सा नृत्यप्रकाराची सर्वांना माहिती करून देण्याच्या उद्‌देशाने श्री. राजदीप यांनी ही कार्यशाळा आयोजित केली होती. त्यांनी अतिशय सोप्या पद्धतीने या नृत्य प्रकाराच्या स्टेप्स येथे सादर केल्या.

या कार्यशाळेत १५० विद्यार्थी व १५ शिक्षकांनी सहभाग घेतला होता. आभार प्रदर्शनाने व राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.

### चित्रकला व रंगकला यांसाठी कार्यशाळा

सांस्कृतिक मंडळातर्फे १९ डिसेंबर रोजी Drawing & Painting (चित्रकला व रंगकाम) Fine Art या विषयावर एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. आपल्याच महाविद्यालयातील तृतीयवर्ष माहिती तंत्रज्ञान शाखेचा विद्यार्थी स्वप्नील पाध्ये यांनी यावेळी आपण एखादे पोस्टर कशा पद्धतीने तयार करू शकतो व विविध रंगांचा वापर करून रंगवू शकतो याबद्दलच्या महत्त्वपूर्ण टिप्स येथे सांगितल्या.

---

ऐहिक दृष्ट्या मानव समृद्धीच्या शिखराकडे झपाट्याने प्रवास करीत असला, तरी तेवढ्याच वेगाने मानसिकदृष्ट्या तणावांच्या खाईत लोटला जात आहे.

या कार्यशाळेला एकूण ३५ विद्यार्थी व शिक्षकेतर सहकारी उपस्थित होते.

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात अभ्यासक्रम शिबीर**

महाविद्यालयात चालवल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात या अभ्यासक्रमाचे २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाचे शिबीर दि.३१.१२.२०१३ ते ०२.०१.२०१४ या दिवशी पार पडले. दररोज सकाळी ९.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

दि.३१ डिसेंबर रोजी सकाळी ०९.०० वाजता या शिबीराचे उद्‌घाटन डॉ.प्रकाश करमरकर निवृत्त ग्रंथपाल, वझे केळकर महाविद्यालय मुलुंड व प्रा. नारायण बारसे ग्रंथपाल जोशी बेडेकर महाविद्यालय ठाणे यांच्या हस्ते झाले.

या शिबीरासाठी बा. ना. बांदोडकर अभ्यासकेंद्राचे एकूण २४ विद्यार्थी पूर्ण वेळ उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांचे प्रकल्प आराखडे मंजूर झाले.

**महिला विकास कक्ष**

महिला विकास कक्षातर्फे ६ जानेवारी रोजी थोर समाजसेविका श्रीमती सुनंदाताई पटवर्धन यांचे व्याख्यान पतंजली सभागृहात आयोजित करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची भावना रुजली पाहिजे आणि त्यांना सामाजिक गोष्टींबद्दल जागरूकता असली पाहिजे या उद्देशाने हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

सुनंदाताई पटवर्धन यांनी यावेळी त्यांच्या प्रगती प्रतिष्ठान या अशासकीय सामाजिक संस्थेबद्दल माहिती दिली. त्यांची ही संस्था गेली ३५ वर्षे जव्हार तालुकाच्या सर्वांगीण विकासासाठी झटते आहे. जव्हार व मोखाडा तालुक्यातील लोकांचा विकास व्हावा म्हणून त्यांची संस्था तेथे विविध प्रकारचे शैक्षणिक आरोग्यविषयक शेतीविषयक पाणी पुरवठा विषयक इत्यादी अनेक बाबींवर कार्यक्रम आयोजित करत असते.

कार्यक्रमाला ७० विद्यार्थी १५ शिक्षक व ७ शिक्षकेतर सहकारी उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता कु. श्रद्धा राऊत व माधुरी शिऊडकर यांनी विशेष प्रयत्न केले.

**माजी विद्यार्थी स्नेह संमेलन**

माजी विद्यार्थी संघटनेतर्फे दि.११ जानेवारी रोजी सर्व माजी विद्यार्थ्यांचे एक स्नेहसंमेलन संध्याकाळी ४ वाजता पतंजलि सभागृहात आयोजित करण्यात आले होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयातून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांना आमंत्रित करण्यात आले होते.

या स्नेह संमेलनाचे सूत्र संचालन डॉ. सौ. कल्पिता मुळये, संयोजक जैवतंत्रज्ञान विभाग यांनी केले.

या कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर, प्रा. मिलन घोल्बा, प्रा. वेंकटरमन व डॉ. प्रसाद कर्णिक, माजी विद्यार्थी प्रतिनिधी यांनी केलेल्या दीप प्रज्ज्वलाने झाली. यावेळी प्रा. सौ. सोनल व प्रा. आशुतोष जोशी यांनी सरस्वती वंदना सादर केली. तसेच या दोघांनी आपल्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व सध्याचे उपप्राचार्य यांनी रचलेले बा.ना. बांदोडकर गीत येथे सादर केले.

या वेळी प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीच्या आलेखाचे एक सादरीकरण केले.

उडायचं कसं हे आपण विसरतो, तेव्हा आपल्याला वर उचलून घेतो, तो मित्र.

सौ. आदिती देऊस्कर यांनी महाविद्यालयातर्फे चालवण्यात येणाऱ्या Employment Cell ची माहिती यावेळी दिली व माजी विद्यार्थ्यांना असे आवाहन केले की, सध्याच्या विद्यार्थ्यांकरिता नोकरीच्या काही संधी त्यांच्या कंपनीत असल्यास त्याबद्दल माहिती द्यावी.

या स्नेह संमेलनाला महाविद्यालय स्थापन झाल्यापासून ते आतापर्यंत असे विविध वर्षांतील माजी विद्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालय स्थापन झाल्यानंतर पहिल्या बॅचची रसायनशास्त्रातून पदवी घेतलेली विद्यार्थीनी सौ.मंजिरी धर्माधिकारी यावेळी उपस्थित होत्या. त्यांनी एक छान कविता यावेळी सादर केली.

तसेच महाविद्यालयामुळे आज आपण एका चांगल्या ठिकाणी कामावर आहोत. या महाविद्यालयाने आयुष्यात चांगल काही करण्याकरिता एक संधी उपलब्ध करून दिली असे मतही अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. या स्नेह संमेलनामुळे अनेकांच्या जुन्या स्मृतींना उजाळा मिळाला.

यावेळी आलेल्या प्रत्येक माजी विद्यार्थ्याला Friendship band बांधण्यात आला व एक छोटेखानी Thank you card महाविद्यालयाची आठवण म्हणून देण्यात आले.

कार्यक्रमाला माजी विद्यार्थी, माजी शिक्षक व शिक्षकेतर सहकारी, सध्याचे शिक्षक असे एकूण १६० जण उपस्थित होते.

सौ. कादंबरी मांजरेकर यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**अभिनंदन**

• सौ. देवयानी लढे, लिपिक यांनी महर्षी दयानंद कला. विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय परेल आयोजित Sport Medicine Workshop यामध्ये सहभाग घेतला.

सौ. देवयानी लढे यांनी सदगुरू एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ फिजीकल एज्युकेशन, जळगाव येथे २६-२८ डिसेंबर २०१३ या कालावधीत घेण्यात आलेल्या Research on Yoga, Health and Sports या आंतरराष्ट्रीय परिषदेत 'Effect of Yoga on Health and Quality of Life, among Urban House wives' या विषयावर पेपर सादर केला. सौ. देवयानी लढे यांनी Masters Athletic Federation of India, Nagpur यांच्या तर्फे दि.११-१२ जानेवारी २०१४ रोजी आयोजित केलेल्या १०,००० मीटर धावण्याच्या शर्यतीत द्वितीय क्रमांक पटकावला.

सौ. देवयानी लढे यांनी ३५ व्या महाराष्ट्र मास्टर्स ॲथलेटीक इंटर डिस्ट्रीक्ट चॅम्पियनशिप स्पर्धेत, Triple Jump मध्ये तृतीय क्रमांक पटकवला.

• प्रा. प्रकाश माळी, यांची महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या रसायनशास्त्र विषयाच्या अभ्यासमंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.

• डॉ.एम.व्ही.रत्नम, रसायनशास्त्र विभाग यांची कॅसच्या मुलाखतीसाठी विद्यापीठातर्फे रसायनशास्त्रातील तज्ज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, तसेच त्यांचा विद्यार्थी राजीवकुमार राजबहादुर याने मुंबई विद्यापीठाची पी.एच.डी.ही पदवी प्राप्त केली आहे.

• प्रा.आकांशा शिंदे यांना सॉरबॉन विद्यापीठ, पॅरिस फ्रान्स येथील प्रो.स्वेटलिन यांच्या संशोधन कार्यात सहभागी होण्यासाठी विचारणा करण्यात आली आहे.

डॉ.मोजेस कोलेट, वनस्पतिशास्त्र विभाग यांना पर्यावरणशास्त्र या विषयाच्या M.Sc., By Papers या करिता मुंबई विद्यापीठाचे शिक्षक म्हणून मान्यता मिळाली.

• डॉ.आर.पी.आठल्ये, प्राणिशास्त्र विभाग व डॉ.पूनम

कुर्वे, प्राणिशास्त्र विभाग यांना पर्यावरणशास्त्र या विषयावर Ph.D. पद्वीकरिता मार्गदर्शक म्हणून मुंबई विद्यापीठाची मान्यता मिळाली.

**Biodiversity : Status & Challenges in Conservation "FAVEO 2013"**

महाविद्यालयाचे, प्राणिशास्त्र व पर्यावरणशास्त्र विभाग, सलीम अली 'सेंटर फॉर ऑर्निथॉलॉजी अॅण्ड नॅचरल हिस्टरी, (SACON) कोईम्बतूर (तमिळनाडू) व WWF (India) यांच्या संयुक्त विद्यमाने Biodiversity : Status & Challenges in Conservation "FAVEO 2013" या विषयावर २० व ३० नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय परिषद संपन्न झाली.

परिषदेचे उद्घाटन पद्मश्री डॉ. शरद काळे, संशोधक भाभा अणू संशोधन केंद्र ट्रॉम्बे, यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपल्या भाषणात मनुष्य व निसर्ग हे एकमेकांवर कसे अवलंबून आहेत हे समर्पक उदाहरणे देऊन सांगितले. त्यानंतर निमंत्रित डॉ. गणेश वानखडे, विभाग प्रमुख, प्राणिशास्त्र विभाग, अमरावती विद्यापीठ यांनी कोळ्यांच्या (Spidess) विश्वाबद्दल अदभूत माहिती मांडली. Spider Web चे वैद्यकीय महत्त्व त्यांनी विषद केले.

डॉ. रातु कसांबी, संशोधक, BNHS यांनी Indian Grey Hornbill या पक्ष्याच्या जीवन शैली व पिलांच्या संगोपनाविषयी अतिशय नेटक्या शब्दांत माहिती सादर केली.

डॉ. विजय देशमुख, संशोधक, सेंट्रल मरीन फिशरी रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई यांनी Indicator Species यावर आपले विचार मांडले. यावेळी त्यांनी घुबड हे घनदाट जंगल निवासी असल्याचे निदर्शक आहे, हे नमूद केले.

डॉ. गोल्डीन क्वाड्रोज, वरिष्ठ संशोधक, सलीम अली सेंटर फॉर ऑर्निथॉलॉजी नॅचरल हिस्टरी, यांनी महाराष्ट्रातील समृद्ध वनस्पतिसृष्टी व प्राणिसृष्टी यांबद्दल माहिती दिली.

डॉ. रघुनंदन आठल्ये, उपप्राचार्य, प्राध्यापक, बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ठाणे, यांनी ठाणे खाडीची २० वर्षांपूर्वीची व सध्याची जैवविविधता यांची तुलना करुन असा विचार मांडला की, घनकचऱ्याचे व सांडपाण्याचे व्यवस्थापन केल्यास प्रदूषित ठाणे खाडीला पुनः संजीवनी देणे शक्य आहे.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी, डॉ. आर. नागराजन, प्राणिशास्त्र विभाग, ए. व्ही. सी. महाविद्यालय, चेन्नई यांनी Oystercatehers च्या विशेष गुणांबद्दल सादरीकरण केले.

डॉ. गीतांजली देशमुख, प्रमुख संशोधक, सेंट्रल मरीन फिशरी रिसर्च इन्स्टिट्यूट, मुंबई यांनी महाराष्ट्रातील सागरी जैवविविधता व सामाजिकता भूमिका यावर भाषण केले.

डॉ. नरसिंह ठाकूर, संशोधक, NIO, गोवा, यांनी DNA Barcoding यावर माहिती दिली. त्यांनी Molecular Making व Species Identification यांचे महत्त्व विषद केले.

कु. गौरी गुरव, शिक्षण अधिकारी, WWF India, यांनी पर्यावरण शिक्षण याबद्दल माहिती दिली. पर्यावरण शिक्षण मुलांना लहान वयात देणे योग्य आहे, हे नमूद केले.

डॉ. बबन इंगोले, संशोधक, NIO, गोवा, यांनी सागरी जैवविविधता व इकोसिस्टीम यावर भाषण केले. पर्यावरण संवर्धन करण्याकरता मानवाचा सहभाग महत्त्वाचा, आहे असे प्रतिपादन केले.

या परिषदेत १४२ विद्यार्थी व ६८ शिक्षक संशोधकांनी सहभाग घेतला.

परिषदेचा समारोप प्रसंगी डॉ. बबन इंगोले वरिष्ठ शास्त्रज्ञ, NIO, गोवा, हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

---

जीवनात सुखाप्रमाणे दुःखाचेही स्वागत करा, ते आपल्याला प्रगतीची संधी देते.

बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी परिषदेचा दोन दिवसाचा आढावा घेतला. Organising Secretary डॉ. सौ. पूनम कुर्वे यांनी केलेल्या आभार प्रदर्शनाने परिषदेची सांगता झाली.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

- वि. प्र. म. चे टी. एम. सी. विधी महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक श्री. विनोद एच. वाघ यांनी पेंढरकर कला महाविद्यालय डोंबिवली यांनी आयोजित केलेल्या सात दिवसीय 'संशोधन पद्धती' या विषयावर कार्यशाळेमध्ये भाग घेतला. सदर कार्यशाळा दिनांक ३० डिसेंबर ते ५ जानेवारी या दिवशी घेण्यात आली.
- महाविद्यालयाचे दिनांक १०, ११ व १२ जानेवारी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून उत्स्फूत प्रतिसाद दिला.
- महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार यांनी आय. सी. एस. एस. आर. यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये भाग घेतला. सदर चर्चासत्र हे अंधेरी येथील तोलानी महाविद्यालयात भरविण्यात आले होते. या सत्रामध्ये श्रीमती श्रीविद्या जयाकुमार यांनी या विषयावर शोध निबंध सादर केला.
- महाविद्यालयाने व्ही. पी. एम्स. एन मायकलोपिडीया आणि विविध कायदेशीर संकल्पना डॉ.मुर्ती, यांना पाठविल्या.
- महाविद्यालयाच्या विविध विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धांत भाग घेऊन पारितोषिके मिळविली.

| क्र. | स्पर्धा | तारीख / आयोजक | विद्यार्थी | बक्षिस |
|---|---|---|---|---|
| १. | अभिरूप न्यायालय | एम. पी. विधी महाविद्यालय, औरंगाबाद | अबोली देवधर कु. सोमील | – |
| २. | अभिरूप न्यायालय | के. के. लुधिया मेगोरियल, दिल्ली | क्रिष्णा कामत, आकाश वारंग, रजनी कृष्णन | – |
| ३. | वक्तृत्व | नानी पालखीवाला मेमोरियल, मुंबई (१८, २६ जानेवारी) | अंजली पंडीत | प्रथम |
| ४. | अभिरूप न्यायालय | बाय. सी. विधी महाविद्यालय, कराड (२५ जानेवारी) | अबोली देवधर, संजय राजन लाकुरे | सर्वोत्तम संशोधन राजन |
| ५. | निबंध स्पर्धा आणि लिगल क्विज | बाय. सी. विधी महाविद्यालय, कराड (२५ जानेवारी) | संतोष गिरी<br>संदीप गुजाळ<br>पुजा दोषी, स्नेहलता | द्वितीय<br>तृतीय |

एक सत्कर्म हे अनेक सद्‌विचारांपेक्षा खूपच मोलाचे असते.

• मॉडेल इंडियन पॉर्लीयामेंट सेशन : वि. प्र. म. चे टि. एम. सी. विधी महाविद्यालय व रोटरी क्लब ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने, प्रांगणातील पेशवे सभागृह येथे अभिरूप भारतीय संसद सत्र या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संविधान दिवसाचे औचित्य साधून दिनांक २७ जानेवारी २०१४ या दिवशी सकाळी ८ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत कार्यक्रम राबविण्यात आला. सदर सत्रामध्ये एकूण पाच महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये टी. एम. सी. विधी महाविद्यालय, विधी महाविद्यालय डी. वाय. पाटील विधी महाविद्यालय, जोशी–बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालय, काळसेकर कला व वाणिज्य महाविद्यालय विधी महाविद्यालय, मुंब्रा यांचा समावेश होता. सदर कार्यक्रमात प्रश्नकाल व बिलावर चर्चा घडविण्यात आली. यासाठी परिक्षक म्हणून निवृत्त जिल्हा न्यायधीश एस. एस. देशमुख, अॅड. विभावरी कावले, आणि मुख्यध्यापिका भोसले मॅडम लाभले. यामध्ये खालील विद्यार्थ्यांनी विविध पारितोषिके मिळविली.

१. आमच्या विधी महाविद्यालयाचे श्री. संतोष गिरी, तृतीय वर्ष विधी यांनी उत्कृष्ट वक्त्याचे द्वितीय पारीतोषिक पटकाविले. (विरोधी पक्ष नेता)

२. उत्कृष्ट संशोधनासाठी असलेले द्वितीय परीतोषिक आमच्या विधि महाविद्यालयाचे श्री. मनीष काळे, प्रथम वर्ष विधि यांना मिळाले.

३. उत्कृष्ट उत्तराचे पारितोषिक आमच्या महाविद्यालयाचे द्वितीय वर्ष विधीचे विद्यार्थी श्री. दिनानाथ पांडे (रेल्वे मंत्री) यांनी पटकावले.

• अधिवक्ता कार्यशाळा : महाविद्यालयाचे विद्यार्थी, कु. क्रिष्णा कामत, कु. आकाश वारंग आणि कु. रजनी कृष्णन यानी यशस्वीरित्या अधिवक्ता कार्यशाळेमध्ये भाग नोंदवला. सदर कार्यशाळा जार्ज वॉशिंग्टन विद्यापीठ विधी स्कूल आणि कॅम्पस विधी केंद्र दिल्ली विद्यापीठ यांनी १७ जानेवारी २०१४ रोजी आयोजित केली होती.

• विद्यापीठ स्तरीय बॅडमिटन स्पर्धा : जोशी–बेडेकर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या विद्यापीठ स्तरीय बॅडमिंटन स्पर्धेमध्ये टी. एम. सी. विधी महाविद्यालयाच्या खालील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविल्या.

टेबल टेनिस (महिला) – प्राजक्ता टिपले – प्रथम

टेबल टेनिस (पुरुष) – स्वप्नील भोसले – तृतीय

• महाविद्यालयाचे द्वितीय विधी वर्षाचे देवकीनंदन सिंग यांनी उल्हासनगर येथील नारी गुरसुहानी विधी महाविद्यालय आयोजित रिसर्च ओ. डी. सी. या स्पर्धेमध्ये 'समलैंगिकता' या विषयावर निबंध सादर केला.

• संविधान दिवसाचे औचित्य साधून महाविद्यालयाने दिनांक २३ जानेवारी २०१४ रोजी भारतीय संविधानावर वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. अॅड. संजय वैद्य आणि डॉ. बर्वे हे परीक्षक म्हणून हजर होते. स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक कृष्णा कामत, द्वितीय अभिषेक सावंत व तृतीय शिक्षर महिश्वरी यांनी मिळविले.

## डॉ. व्ही. एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**राष्ट्रीयवित्त संमेलन (National Finance Summit 2014 )**

दिनांक ११ जानेवारी रोजी डॉ. व्ही. एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेतर्फे राष्ट्रीय वित्त संमेलन २०१४ चे आयोजन करण्यात आले. संमेलनाचे या वर्षीचे विषयसूत्र होते ''संस्थात्मक वित्त व्यवस्थेतील / औद्योगिक वित्त व्यवस्थापन क्षेत्रातील प्रवाह'' (Trends In Corporate Finance) संमेलनाच्या उद्घाटन पर भाषणात डॉ. अमित ओक (संचालक ) यांनी अशा

प्रकारची संमेलने उद्योग संस्था आणि व्यावसायिक अभ्यासक्रम या मधील अंतर कमी होण्याच्या दृष्टीने कशा प्रकारे उपयुक्त आहेत याबद्दल आपली मते मांडली त्यानंतर त्यांनी संस्थात्मक वित्तव्यवस्थेचे / औद्योगिक वित्त व्यवस्थापनाचे (Corporate Finance) महत्त्व व त्यासंबधी आपले विचार व्यक्त केले .

डॉ. पी . एम . केळकर ( अधिष्ठाता ) यांनी संमेलनाच्या विषया संदर्भात आपले विवेचन सादर करताना असे सांगितले की, व्यवस्थापन शाखेचे विद्यार्थी या औद्योगिक वित्त व्यवस्थापन क्षेत्रात; मूल्यनिश्चिती (Pricing decisions), वार्षिक अहवालाचे विश्लेषण (analyzing Annual Reports), व्यवसायप्रतिकृती मध्ये नावीन्यता (making innovations in business model) अशा विविध कार्यात आपले योगदान देऊ शकतात. तसेच औद्योगिक वित्त व्यवस्थापन संदर्भात अंकित स्वाक्षरी (Digital Signature), IFRS , आर्थिक घोटाळे , माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे वित्त क्षेत्रातील वाढते महत्त्व इत्यादी मुद्द्यांवरही त्यांनी आपले विचार मांडले.

डॉ. गुरुप्रसाद मूर्ती (सर संचालक) यांनी संमेलनाच्या विषयसूत्र संबंधात विवेचन करताना असे सांगितले की भारतीय औद्योगिक वित्त व्यवस्थापन क्षेत्रात वैचारिक पालट, सामाजिकीकरण, नियंत्रण, नियमन या मुळे औद्योगिक वित्त व्यवस्थापनातील प्रवाहाने पुन्हा उलटे वळण घेतले आहे. उदारीकरणानंतरच्या काळात धोरणात्मक बदलांमुळे भारताच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होण्यास सुरुवात झाली आणि जागतिकीकरणानंतर तर भारतीय वित्त व्यवस्थेने विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू केली व त्यानंतर सर्वात जास्त कर भरणारे राष्ट्र अशी ओळख असणाऱ्या भारतात आता कर दर ९५% वरून घसरून ३०% वर आला आहे.

औद्योगिक वित्त व्यवस्थापन क्षेत्रांतील बदलत्या प्रवाहांमुळे व्यवसायाची गणितेदेखील बदलली आणि या मुद्द्याशी संबंधित विषयाच्या अभ्यासक्रमातदेखील बदल करावे लागले असेही त्यांनी सांगितले.

संमेलनाचे प्रमुख अतिथी डॉ. विष्णू कान्हेरे यांनी "State of Art in Corporate Finance in India Inc." या विषयावर आपले बीज भाषण सादर केले. वित्त व्यवस्था हा अर्थव्यवस्थेसाठी किंवा कोणत्याही उद्योग संस्थे साठी अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. २००८ सालची जागतिक मंदी ही वित्त विश्वातील एक महत्त्वाची घटना होती की ज्यामुळे अनेक देशांना त्यांच्या धोरणाचे ढाचे बदलणे भाग पडले. १९९१ सालच्या उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरणसारख्या धोरणामुळे आलेल्या स्पर्धेमुळे भारतात वित्ताची उपलब्धता खूपच वाढली असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. स्वातंत्र्यपूर्व काळ, स्वातंत्र्योत्तर काळ, जागतिकीकरणानंतरचा काळ अशा विविध काळांत वित्त व्यवस्थापनातील प्रवाह कसे बदलत गेले या विषयी आपली मते त्यांनी मांडली तसेच Electronic Fund Transfer, आर्थिक विकास दर इत्यादी मुद्द्यांवरही त्यांनी आपली मते मांडली.

त्यानंतर श्री. अश्विनी कुमार शर्मा (Former SBI Senior Deputy Manager, SBI) यांनी औद्योगिक वित्त व्यवस्थापन क्षेत्रात बँकांची भूमिका या संदर्भात आपले विचार मांडले . उदारीकरणा नंतर च्या काळात औद्योगिक वित्त व्यवस्थापन संदर्भात बँकांना अतिशय महत्त्वाची भूमिका वठवावी लागली व अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. औद्योगिक क्षेत्रातील उत्पादनाच्या संथ गतीमुळे नफ्यावर होणारा परिणाम, तसेच credit appraisal method, credit risk mitigation mechanism, Corporate governance structure इत्यादी मुद्द्यांवर त्यांनी सादरीकरण केले.

संमेलनातील तिसरे वक्ते श्री. संदीप गोपाळ गोखले (Group President & Natural Resources &

Business Development at JSW Group) यांनी "Perspective of Line Manager on Trends in Corporate Finance" या विषयावर व्याख्यान दिले . परदेशी गुंतवणूक (FDI), वित्तीयतूट (Fiscal deficit), वार्षिक सकल उत्पन्न (GDP), आयात निर्यात धोरण (EXIM policies), करांचे दर (Tax rates) इत्यादींचा औद्योगिक क्षेत्रावर होणारा नकारात्मक परिणाम, भारतीयांचा गुंतवणुकी पेक्षा खरेदी किंवा खर्चाकडे झुकलेला कल, Stategic Investor अशा विविध बाबींवर त्यांनी आपल्या व्याख्यानात चर्चा केली .

त्यानंतर चे वक्ते श्री. ओमकार सावंत (PAN India Team at CRISIL Research) यांनी Stategic Management या विषयावर सादरीकरण केले. या मध्ये त्यांनी औद्योगिक वित्त व्यवस्थापन संदर्भात क्षेत्रातील नवनवीन संकल्पना जसे ESO (Employee Stock Option), Dividend Payment, ECB (External Commercial Borrowings) इत्यादी बाबत माहिती दिली. तसेच पत मूल्यांकनाचा (Credit Ratings) उद्योग संस्थांच्या कर्ज घेण्याच्या निर्णयावर होणारा परिणाम, आधुनिक व्यवस्थापनांनी वापरलेल्या अंतर्गत व बाह्य जोखीम व्यवस्थापन पद्धती इ. मुद्द्यांवर त्यांनी आपले विचार मांडले.

सकाळच्या प्रेरणादायी व्याख्यान सत्रानंतर संमेलनाच्या दुसऱ्या सत्रात संमेलनाच्या विषयावर आधारित एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये श्री. एस. कृष्णन (Former, forex treasury dealer), डॉ . व्ही. बी. एस. रेड्डी (CEO, Lybar Capital Advisors Ltd.) आमची माजी विद्यार्थिनी संपदा सावंत (Morgar Stanley) आणि माजी विद्यार्थी सुहास काकडे (Sr. Executive Indirect Taxation, Siemens India Ltd.) या तज्ज्ञांनी सहभाग घेतला. परिसंवादाचे संचालन परिसंवादाच्या अध्यक्षा सौ. एस. एस. जपे (Assistant Professor, DR. V. N. BRIMS) यांनी केले. या संमेलनाच्या निमित्ताने आठवडाभर आधी विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या विविध इ - स्पर्धांमधील विजेत्यांना प्रमाणपत्र देण्यात आली आणि आभार प्रदर्शनाने संमेलनाची सांगता करण्यात आली. संमेलनाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

### महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनी आकाश टॅबचे वितरण

महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय व भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (आय.आय.टी.), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून आकाश-२ या टॅबचे वेळणेश्वर न्यू इंग्लिश स्कूलच्या इयत्ता ८ वी ९ वीच्या विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले.

महाविद्यालयाच्या नाना फडणवीस सभागृहात आकाश-२ या टॅबचा वितरण सोहळा ठीक सकाळी १० वाजता संपन्न झाला. या कार्यक्रमास भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (आय.आय.टी) मुंबईच्या आकाश प्रकल्पाच्या समन्वयक डॉ. किरण खोसला, विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाचे संचालक डॉ. कमलाकर देसाई, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शिल्पा कामत, सह्याद्री शिक्षण मंडळाचे संचालक श्री. उमेश लकेश्री, न्यू इंग्लिश स्कूल, वेळणेश्वर शाळेचे मुख्याध्यापक श्री. भास्कर पवार व इतर मान्यवर उपस्थित होते.

तंत्रज्ञान क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा फायदा खेड्यातील शाळांना व्हावा तसेच शहरातील शैक्षणिक प्रगती व खेड्यातील शिक्षण व्यवस्था यांतील दरी भरून काढण्याचे काम या आकाश-२ प्रकल्पामुळे होणार आहे.

या उपक्रमात विद्यार्थी, शाळेचे शिक्षक व महाविद्यालयांचे प्रतिनिधी यांनी संयुक्तपणे सहकार्य करून हा प्रकल्प यशस्वी करावा असे मनोगत डॉ. किरण खोसला यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी आकाश-२ या टॅबचे तंत्रज्ञान विकसित करण्यात सहभागी असलेले भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (आय. आय. टी.) मुंबई या प्रकल्पाचे इंजिनिअर श्री. पंकज पाटील यांनी आकाश-२ प्रकल्पातील बारकावे व टॅबच्या तांत्रिक घटकाविषयी माहिती दिली.

वेळणेश्वरमध्ये हा प्रकल्प आणण्याचा मानस असलेले विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी आकाश-२ व प्रजासत्ताक दिन या दोन्ही बाबत आपले मनोगत व्यक्त केले. भारतातील संशोधकांचे तंत्रज्ञानातील योगदान अतिशय अभ्यासपूर्वकपणे समजावून सांगितले. तसेच, महाविद्यालयाद्वारे सामाजिक व राष्ट्रीय दृष्टिकोनातून होणारा आकाश-२ हा प्रकल्प कसा राबवावा या विषयी मार्गदर्शन केले.

आकाश-२ प्रकल्पाचे प्रमुख व भारतीय प्रौद्योगिकी संस्थान (आय. आय. टी.) मुंबईतील संगणक अभियांत्रिकी या विभागाचे प्रमुख पद्मश्री डॉ. दिपक फाटक यांनी स्काईप या आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे याप्रसंगी मार्गदर्शन केले. आकाश-२ प्रकल्प चालू करण्यामागील उद्देश, या अगोदर पंढरपूर येथे राबविल्या गेलेल्या प्रकल्पाचे अनुभव, शिक्षक, विद्यार्थ्यांकडून या प्रकल्पाविषयीच्या अपेक्षा त्यांनी या प्रसंगी व्यक्त केल्या. हा प्रयोगात्मक प्रकल्पात यशस्वी झाल्यावर शालेय स्तरावरील सर्व विद्यार्थ्यांना या टॅबचा व त्या संबंधित तंत्रज्ञानाचा फायदा होणार आहे असा आशावाद यांनी या प्रसंगी बोलून दाखविला.

वेळणेश्वर येथील न्यू इंग्लिश स्कूल या शालेयविषयाची माहिती महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शिल्पा कामत यांनी सांगितली. नंतर त्या शाळेच्या ७६ विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते टॅबचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यातील अनेक माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते. वेळणेश्वर शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक व ग्रामस्थांनी या प्रकल्पाविषयी जाणून घेण्यासाठी उपस्थिती दर्शविली. तसेच श्री. राजू कुंभार, शाखा व्यवस्थापक, युनियन बँक, पालशेत हे या प्रसंगी उपस्थित होते.

याच दिवशी दुपारी १२ वाजता सर्व उपस्थित मुख्याध्यापकांचे व प्रौद्योगिकी संस्थान (आय. आय.टी.), मुंबईच्या आकाश -२ या प्रकल्पाच्या समन्वयक म्हणून काम पाहणाऱ्या डॉ. किरण खोसला यांचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले व या प्रकल्पासाठी आणखी काही शाळांचे सहकार्य मिळाल्यास तेथेही हा प्रकल्प राबवण्याची इच्छा त्यांनी या प्रसंगी व्यक्त केली.

●●●

### *कृपया नोंद घ्यावी*

या वेळच्या अंकात परिसरवार्तासाठी बराच मजकूर आला आहे. त्यापैकी काही संस्थांच्या वार्तांचे संकलन पुढील अंकासाठी मागे ठेवावे लागत आहे. याची कृपया नोंद घ्यावी. आपल्या संस्थेशी संबंधित वार्ता संकलन न आढळल्यास त्या मजकूराचा नंतर समावेश होईल.

परिसर वार्तासाठी आपण देत असलेल्या सहकार्याबद्दल दिशातर्फे आभार!

**- कार्यकारी संपादक**

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

कोणतेही दुष्कृत्य करण्यापूर्वीच त्या दुष्कृत्याचे फळ भोगणे अत्यंत यातनामय असते हे ध्यानात घ्या.

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे**. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,<br>
**डॉ. विजय बेडेकर**<br>
कार्याध्यक्ष<br>
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

---

कोणत्याही आंदोलनाचे यश हे त्या आंदोलनाला लाभलेल्या बौद्धिक नेतृत्वाच्या क्षमतेवर ठरते. बौद्धिक नेतृत्वाशिवाय चालणारे भावनिक आंदोलन दिशाहीन ठरू शकते.

# विद्या प्रसारक मंडळ

विष्णुनगर, नौपाडा, ठाणे ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५४२६२७०


*भारतातील महान गणितज्ज्ञ व खगोलशास्त्रज्ञ भास्कराचार्य यांच्या सन्मानार्थ ठाणे येथील विद्या प्रसारक मंडळ या संस्थेने त्यांचे ९०० वे जन्म वर्ष साजरे करायचे ठरविले आहे. त्या निमित्ताने तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे.*

*अनेक पिढ्या ज्योतिषशास्त्राची परंपरा असणाऱ्या विद्वान कुटुंबात भास्कराचार्यांचा इ.स. १११४ साली जन्म झाला. सर्व ज्ञानशाखांत नैपुण्य मिळवत त्यांनी गणित व खगोलशास्त्राच्या साहित्यात मोलाची, महत्त्वाची भर टाकली. विषयाची परिपूर्ण हाताळणी, साहित्याचे विचारपूर्ण संगठन केले आणि विषय स्पष्टपणे मांडले, ज्याचा येणाऱ्या शतकांतील विषयांच्या विकासावर प्रभाव पाहावयास मिळतो. भास्कराचार्यांच्या साहित्याचा सर्व देशांत अभ्यास केला जातो व त्यावर अनेक प्रकारचे टीकात्मक व अभ्यासपूर्ण साहित्य निर्माण केले जाते.*

# भास्कर ९००

## आंतरराष्ट्रिय परिषद

## भास्कराचार्यांच्या ९०० व्या जन्म वर्षनिमित्ताने

विबुधाभिवन्दितपदो जयति श्रीभास्कराचार्यः

**शुक्रवार दि. १९; शनिवार दि. २० आणि रविवार दि. २१ सप्टेंबर २०१४**

स्थळ :
थोरले बाजीराव पेशवे सभागृह,
ज्ञानद्वीप, ठाणे महाविद्यालय परिसर,
चेंदणी, बंदर रोड, ठाणे, महाराष्ट्र, भारत – ४०० ६०१

**http://www.vpmthane.org/bhaskara900/**

भास्कर ९००

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह
विद्या प्रसारक मंडळ
विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.